## राऊतांनी कुणाकडून किती पैसे घेतले ती यादी आमच्याकडे- संजय शिरसाट

**मुंबई, दि. २३ प्रतिनिधी**

नीलम गोऱ्हे काय बोलल्या हे मला माहीत नाही मात्र मागच्या निवडणुकीच्या वेळेस जे त्यांचे (शिवसेना उद्धव ठाकरे) उमेदवार होते त्यांनी आपण पैसे देऊन उमेदवारी घेतली असे जाहीर केले आहे. इतर पक्षातील अनेकांना त्यांनी पैसे घेऊन तिकीट दिले आहे. आमच्या मतदार संघात कन्नड, पैठण, सिल्लोड, वैजापूर आणि पश्चिम मतदार संघात देखील पैसे देऊन तिकीट दिली गेली आहेत. आधी कार्यकर्त्यांना तिकीट दिले जात होते मात्र आता पैसे देईल त्याला तिकीट देऊ अशी भूमिका आहे. म्हणून त्यांना जनतेने नाकारले आहे. म्हणून त्यांचे संख्याबळ २० वर येऊन ठेपले आहे. आम्ही काहीच करत नाही असा आव आणून त्यांनी फुशारकी मारू नये. असे संजय शिरसाट म्हणाले. संजय राऊत यांनी कुणा कुणाकडून पैसे घेतले याची यादी आमच्याकडे सुद्धा आहे. तिकीट जाहीर करताना जो गोंधळ संजय राऊत यांनी घातला आहे गरज पडल्यास त्या लोकांना आम्ही उभे करू असेही शिरसाट यांनी म्हटले आहे.


नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

* वर्ष ५० * अंक २४१ * ✻ अमरावती ✻ सोमवार, दिनांक २४ फेब्रुवारी २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)



महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी,
वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात


संपादकीय
**खरीखरी**

## समृद्धीची शिस्त

आज आम्ही नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गावर एक भयानक अपघात बघितला. त्यात दोन ट्रक परस्परांवर आदळून पलटी झालेले होते. त्यासोबत एका कारचेही त्या दोन बलाढ्य ट्रक्सच्या टकरीत चांगलेच नुकसान झाले होते. आम्ही या स्तंभात अनेक वेळा समृद्धीच्या शिस्तीबद्दल चर्चा केलेली आहे. इतका चांगला महामार्ग केवळ दिलेल्या सूचनांचे पालन न केल्यामुळे वारंवार बदनाम होत आहे. या महामार्गावर एकूण तीन पदर आहेत. पहिला १२० किमी प्रतितास वेगाने चालणारी वाहने, दुसरा १०० किमी प्रतितास वेगाने चालणारी वाहने आणि तिसरा ८० किमी प्रतितास या वेगाने चालणारी वाहने अशी या महामार्गाची रचना आहे. त्याशिवाय बाजूला आणखीन एखादी गाडी बंद वगैरे पडली. तर थांबू शकते इतकी जागा आहे. असा हा महामार्ग आमच्या आवडीचा आहे. महिन्यातून किमान दोन ते तीन वेळा या महामार्गाचा उपयोग आम्हाला करावाच लागतो. १२० किमी वेगाच्या लेनमध्ये अनेक ट्रक चालक अवघ्या ७० ते ८० च्या गतीने आपले ट्रक चालवत असतात. तर ८० किलोमीटरच्या लेनमध्ये कित्येक कारचालक सर्रासपणे प्रति तास १०० पेक्षा जास्त वेगाने बिनधास्तपणे आपली वाहने दामटवीत असतात. एका लाईन मधून वाहन चालवत असताना दोन वाहनांमध्ये किमान २०० मीटरचे अंतर असावे, असा नियम आहे. पण या नियमाचे सुद्धा कित्येक महाभाग अजिबात पालन करीत नाहीत. १२० च्या गतीने चालणाऱ्या गाडीला पुढच्या गाडीने ब्रेक मारल्यावर नियंत्रित होण्यासाठी किमान ३० ते ४० मीटर तरी अंतर हवे असते. या महामार्गावर बेशिस्तपणे जाणाऱ्या गाड्यांना कोणीही थांबवित नाही. त्यांना दंड सुद्धा लावत नाहीत. १२० किमी प्रतितास वेगाच्या लेन मधून त्या वेगापेक्षा कितीतरी जास्त गतीने जाणारी वाहने सुद्धा नागमोडी वळणे घेऊन भराभर जातात. विशेष म्हणजे नियमाप्रमाणे चालणाऱ्या वाहनांना ओव्हरटेक करून हे बेशिस्त वाहन चालक पुढे जात असतात. ही धावाधाव जीवघेणी आहे. या घाईमुळेच तुम्ही फार तर दहा-पंधरा मिनिटे वाचवू शकता. पण अपघात झाल्यावर जीव वाचवू शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे. केवळ समृद्धी महामार्गच नाही तर इतर अनेक महामार्गावर सध्या अशीच तुफान वेगाची समृद्धी सुरू आहे. देशाचे महामार्ग आणि रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांनी बेशिस्त वाहन चालकांसाठी मोठमोठ्या दंडाची योजना केलेली आहे. पण आमच्या गाड्या चालवणाऱ्या महाभागांना त्याची जराही तमा बाळगण्याची गरजच वाटत नाही. कोट्यवधी रुपये खर्च करून बांधलेल्या महामार्गावर जी वाहने बेशिस्तपणे जात असतील. तर ज्या ज्या ठिकाणी, ज्या ज्या गावात ही वाहने महामार्गावरून बाहेर पडतात. त्याच ठिकाणी त्यांच्या हातात त्यांनी केलेल्या चुकांची जंत्री देणारी यंत्रणा उभारणे व त्यांना नियमाप्रमाणे तिथल्या तिथे दंड लावून तो वसूल करणे, आता अत्यावश्यक झालेले आहे. या आमच्या सूचनेवर रस्ते विकास महामंडळ गंभीरपणे लक्ष देईल आणि होणारी जीवित हानी थांबवेल, अशी अपेक्षा आपण करावी काय?


nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023


# उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडीज दिल्या की एक पद मिळायचे - नीलम गोऱ्हे

**अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील वक्तव्यामुळे महाराष्ट्रात राजकीय वादळ**



**नवी दिल्ली, दि. २३ वृत्तसंस्था**

९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सध्या दिल्लीत सुरु आहे. मराठी साहित्य संमेलनात 'असे घडलो आम्ही' या कार्यक्रमात शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मोठा आरोप केला आहे. ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडीज दिल्या की एक पद मिळायचं, असा खळबळजनक विधान नीलम गोऱ्हे यांनी केलं आहे. नीलम गोऱ्हे यांच्या या वक्तव्यानंतर महाराष्ट्राच्या वर्तुळात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे.

कुठल्याही कार्यकर्त्याला कमी लेखण्याचं काही कारण नाही. २०१२ वगैरे पर्यंत मी पाहात आले आहे की शिवाजी पार्क येथे होणाऱ्या सभा, मेळाव्यांना एकनाथ शिंदे यांचेच कार्यकर्ते गर्दी करायचे. दुसरा भाग असा की संपर्क नको असेल नेत्यांना तर तिथे आपण राहण्यात काही अर्थ नाही. ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडिज गाड्या मिळाल्या की एक पद मिळते ही वस्तुस्थिती आहे. बाळासाहेब ठाकरे जोपर्यंत होते तोपर्यंत त्यांचं सगळीकडे लक्ष होतं. नंतर अवनती होत गेली असं नीलम गोऱ्हे म्हणाल्या. त्यानंतर त्यांनी आम्हाला भेटीच मिळणार नाहीत हे माहीत नव्हतं असंही म्हणाल्या.

२०१९ ला जेव्हा उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले तेव्हा आम्हाला धन्यता वाटली होती. कारण बाळासाहेब ठाकरेंच्या मुलाला ते पद मिळालं याचा आम्हाला आनंद झाला होता. पण आमदारांना भेटी मिळणार नाहीत. कुठल्याही विषयासाठी भेट मिळणार नाही, दोन ते तीनवेळा आरटीपीसीआर केली तरीही भेट मिळणार नाही. यानंतर प्रश्न असा तयार होतो की स्थित्यंतरं होतात ती काही मुदपाक खान्याच्या विश्लेषणातून होत नाहीत. एकनाथ शिंदे यांना नुकताच महादजी शिंदे पुरस्कार मिळाला आहे. ते या सगळ्यावर बोलतील. असंही नीलम गोऱ्हे म्हणाल्या. साहित्य संमेलनात दिलेल्या मुलाखतीत त्यांनी हे वक्तव्य केलं आहे.

ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडीज दिल्या की एक पद मिळायचं, असा आरोप नीलम गोऱ्हे यांनी केला. यावर ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे. ही नीलम गोऱ्हेंची नमकहरामी आहे, असं प्रत्युत्तर अंबादास दानवे यांनी दिलं. मी ग्रामीण भागातील सर्वसामान्य कार्यकर्ता आहे. आज मी राज्याचा विरोधी पक्षनेता आहे. मला उलट पक्षाने वेगवेगळ्या कामासाठी निधी दिला. माझ्याकडे पक्षाने कधीही पैसे मागितले नाही, असं अंबादास दानवे यांनी स्पष्ट केलं. एबीपी माझाला दिलेल्या प्रतिक्रियेत अंबादास दानवेंनी नीलम गोऱ्हेंवर ही टीका केली आहे.

## साहित्य संमेलनाच्या सदस्यांना 50 लाख, आयोजकांना एक मर्सिडीज दिल्याची चर्चा

### संजय राऊतांचा मिश्कील टोला

**मुंबई, दि. २३ प्रतिनिधी**

शिंदे गटाच्या नेत्या नीलम गोऱ्हे यांनी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून ठाकरेंवर आरोप केल्यानंतर आता शिवसेना ठाकरे गट चांगलाच आक्रमक झाल्याचं दिसून येतंय. काही टिनपाट निमंत्रकांनी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठाचा सरळ राजकीय गैरवापर केला. तसेच आपल्या राजकीय विरोधकांवर आरोप केले त्याची जबाबदारी साहित्य महामंडळ घेणार आहे काय? असा सवाल खासदार संजय राऊत यांनी विचारला आहे. तर आरोप करणाऱ्या नीलम गोऱ्हेंनी संमेलनात सहभागी होण्यासाठी सदस्यांना 50 लाख तर आयोजकांना एक मर्सिडीज दिल्याची चर्चा बाहेर सुरू असल्याचा टोलाही राऊतांनी लगावला. संजय राऊत यांनी आखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा उषा तांबे यांना खुलं पत्र लिहित नाराजी व्यक्त केली.



निलम गोऱ्हेंच्या मर्सिडीजच्या आरोपांवर ठाकरे गटाने आक्षेप घेतला आहे. संजय राऊतांनी संमेलनाचे संयोजक संजय नहार यांना फोन करून नाराजी व्यक्त केली. त्यावर राजकारणासाठी साहित्य संमेलन मंचाचा वापर टाळला पाहिजे, अशी प्रतिक्रिया संमेलनाचे संयोजक संजय नहार यांनी दिली आहे.

संजय राऊतांनी पत्रात लिहिले आहे की, दिल्लीतील साहित्य संमेलनात चर्चेत आलेले अनेक चर्चासत्र आणि परिसंवाद हे साहित्यबाह्य होते. एखाद्या राजकीय विचारसरणीच्या दबावाखाली संमेलन व त्यातील कार्यक्रमांचे आयोजन झाले. साहित्य महामंडळाच्या परंपरेस हे शोभणारे नाही. या चर्चा-परिसंवादात काही टिनपाट निमंत्रकांनी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठाचा सरळ राजकीय गैरवापर केला. तसेच आपल्या राजकीय विरोधकांवर आरोप केले त्याची जबाबदारी साहित्य महामंडळ घेणार आहे काय?

नीलम गोऱ्हे यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याबाबत आक्षेपार्ह विधाने केली. साहित्य संमेलन हे अशा राजकीय चिखलफेकीसाठी निर्माण केले काय? सध्याच्या साहित्य महामंडळाची त्यास मान्यता आहे काय? नसेल तर महामंडळाने त्वरित माफी मागावी.

नीलम गोऱ्हे यांनी साहित्य संमेलनाच्या मंचावरून बाहेर पडताच तालकटोरा मैदानाबाहेर पत्रकारांना सांगितले की, "मी महामंडळाच्या सदस्यांना 50 लाख रुपये देऊन या कार्यक्रमात सहभागी झाले आणि उषा तांबे यांना त्याआधी एक मर्सिडीज गाडी भेट देऊन या कार्यक्रमाचे आयोजन करायला लावले."

हे खरे की खोटे माहीत नाही, पण महामंडळाच्या प्रतिष्ठेला त्यामुळे धक्का बसला आहे. साहित्य महामंडळ विकले गेले आहे अशी चर्चा लोकांत होणे हे चित्र चिंताजनक आहे.

## माझ्यासोबत माझी जुनी माणसे राज्यभरात आहे - उद्धव ठाकरे

**मुंबई, दि. २३ प्रतिनिधी**

एकनाथ शिंदेंची शिवसेना नाही तर गद्दार सेना आहे. धनंजय मुंडे, माणिकराव कोकाटे यांचं रक्षण करणं म्हणजे तुमचं हिंदुत्व आहे का असा सवाल करत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी भाजपा आणि एकनाथ शिंदे यांच्यावर हल्लाबोल केला आहे. मातोश्रीवर काँग्रेसमधून बाहेर पडलेले अहिल्यानगर शहर जिल्हाध्यक्ष किरण काळे यांनी शिवबंधन बांधत ठाकरे गटात प्रवेश केला. या पक्षप्रवेशावेळी ठाकरेंनी माध्यमांशी संवाद साधला.



उद्धव ठाकरे म्हणाले की, त्यांनी शिवसेना संपवली असे एकनाथ शिंदेंना वाटते परंतु माझ्यासोबत माझी जुनी माणसे राज्यभरात आहे. उत्तर प्रदेशातही काही पदाधिकारी मशाल हाती घेऊन संघटनांसाठी बैठक घेतायेत तेदेखील माझ्यासोबत आहेत. आज किरण काळेसारखे लढवय्ये कार्यकर्ते आमच्यासोबत येत आहेत. राज्यात आणि देशात अंदाधुंद कारभार माजला आहे त्यांना दूर करून आपले हिंदुत्व, राष्ट्रीयत्व करणे ही जबाबदारी आहे. निवडणूक काळात अनेक रेवड्या देऊन जनतेला फसवले गेले आहे आता त्या रेवड्या उघड्या पडायला लागल्यात असे त्यांनी म्हटले.

त्याशिवाय धर्म जगायचा असतो, तो सांगायचा नसतो हे गाडगे महाराजांनी शिकवलं. ते मी मुख्यमंत्री काळात पाळलेलं आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनीही दुसऱ्या धर्माचा द्वेष करा हे शिकवले नाही. जे या देशाला आपलं मानतात ते आपलेच, ज्यांनी हा धर्माचा खेळखंडोबा केला आहे त्यांचं राजकारणापुरतं मुस्लीम प्रेम कसं आहे याचं मी दाखल्यासह सांगू शकतो. अगदी काल परवा मोदींचे थोरले की धाकटे बंधू हे कोण आहेत ते त्यांनी दाखवले आहे. त्यांच्याबद्दल फार प्रेमाने, आपुलकीने ट्विट केले आहे. निवडणुकीसाठी जी काही धर्मांधता माजवतायेत हे देशासाठी योग्य आहे असं मला वाटत नाही. धनंजय मुंडे, माणिकराव कोकाटे यांचे रक्षण करणे हे भाजपाचं हिंदुत्व आहे का? माझ्या हिंदुत्वाची व्याख्या तरी आहे पण भाजपाच्या हिंदुत्वाची व्याखा काय हे तरी त्यांनी सांगावे असा टोलाही उद्धव ठाकरे यांनी भाजपा आणि शिंदेसेनेला लगावला.

दरम्यान, न्यायलयाने तत्परता दाखवणे गरजेचे आहे. आमच्या खटल्यात ३ वर्ष होऊन गेली तरी अद्याप निकाल लागला नाही. परंतु माणिकराव कोकाटे यांच्या बाबतीत निकाल लागलाय तर किमान त्याची प्रत तरी सन्माननीय राहुल नार्वेकरांना द्यावी अशी कुणी मागणी केली गैर काय..न्यायालयाच्या निर्णयाचा मान सन्मान राखत असतील तर त्यांनी आमच्याबाबतीत जो काही निर्णय दिला तो विचित्र आहे असंही उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

**मर्सिडीजमधून फिरणाऱ्यांनी लाडक्या बहिणींचे पैसे का दिले नाहीत?**

एक महिला म्हणून त्यांचा आदर आहे. राजकारणात त्यांनी त्यांचे चांगभलं केलेले आहे. त्यामुळे त्यांच्यावर फार बोलणार नाही मात्र स्वत: मर्सिडिजमधून फिरणाऱ्यांनी लाडक्या बहिणीचे पैसे का दिले नाहीत हे सांगावे असं सांगत उद्धव ठाकरे यांनी नीलम गोऱ्हे यांच्या आरोपावर भाष्य केले. तर महिला आघाडीचा विरोध असताना उद्धव ठाकरेंनी गोऱ्हेंना ४ वेळा विधान परिषदेची आमदारकी दिली, त्यांनी उद्धव ठाकरे यांना ८ मर्सिडीज दिल्या का याचे उत्तर द्यावे. त्या मर्सिडीज दिल्याचा पावत्या असतील तर त्या दाखवा असं आव्हान संजय राऊतांनी नीलम गोऱ्हेंना केले.

## रोहित शर्माचा वर्ल्ड रेकॉर्ड
## सचिन तेंडुलकरला टाकले मागे

**दुबई, दि. २३ वृत्तसंस्था**

भारतीय संघाचा सलामीवीर आणि कर्णधार रोहित शर्माने पाकिस्तानविरूद्ध सामन्यात एक एतिहासिक विक्रम आपल्या नावे केला आहे. रोहितने पाकिस्तानविरूद्ध सामन्यात फलंदाजीला उतरत खाते उघडताच मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे. रोहितने २०१३ पासून नियमित सलामीवीर म्हणून खेळण्यास सुरुवात केली, तेव्हापासून त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एकापाठोपाठ एक मोठे विक्रम केले आहेत. रोहितने आता सलामीवीर म्हणून असा विक्रम केला आहे, ज्यात त्याने सचिन तेंडुलकरला मागे टाकलं आहे.



रोहित शर्माने चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मध्ये पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात ही मोठी कामगिरी केली होती. रोहित शर्माने पाकिस्तानविरुद्धच्या या सामन्यात खाते उघडताच एकदिवसीय क्रिकेटमध्ये सलामीवीर म्हणून ९ हजार धावा पूर्ण केल्या. त्याने एकदिवसीय क्रिकेटमध्ये केवळ १८१ डावात ९ हजार धावांचा टप्पा ओलांडला. रोहितने सर्वात कमी डावांमध्ये ९ हजार धावांचा आकडा गाठला आहे, जो एक नवा विश्वविक्रम केला आहे.

## मराठा समाजाच्या परिषदेसाठी मुख्यमंत्र्यांनी 10 मार्चपर्यंत वेळ द्यावी, अन्यथा अधिवेशन काळातच आंदोलन

**कोल्हापूर, दि. २३ प्रतिनिधी**

मराठा समाजाच्या परिषदेसाठी मुख्यमंत्र्यांनी 10 मार्चपर्यंत वेळ द्यावी, अन्यथा अधिवेशन काळातच आंदोलन छेडू असा इशारा राज्यातील मराठा संघटनांनी दिला आहे. आज कोल्हापूरमध्ये राज्यातील 42 मराठा संघटनांची एक परिषद पार पडली. या परिषदेमध्ये मराठा आरक्षणाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. सुरुवातीला सरकारशी संवाद साधू जर सरकारने प्रतिसाद दिला नाही तर आंदोलन छेडू असा निर्णय घेण्यात आला. कोल्हापुरात झालेल्या या परिषदेमध्ये 10 टक्के मराठा आरक्षण मिळावं या मागणीवर ठामपणे चर्चा झाली. तसेच हात उंचावून अकरा ठराव मंजूर करण्यात आले. यामध्ये ओबीसी प्रवर्गातील ज्या सोयी सवलती आहेत त्या मराठा समजला आहे तशाच लागू कराव्या हा मुख्य मुद्दा या बैठकीमधून पाहायला मिळाला.



1) महाराष्ट्र शासनाने ओ. बी. सी ममाजाला ज्या ज्या सोयी सवलती लागू केल्या आहेत. त्या जशाच्या तशा मराठा समाजाला सरसकट लागू करणेत याव्यात.

2) हैद्राबाद गॅझेट, सातारा गॅझेट, बॉम्बे गॅझेटनुसार महाराष्ट्र शासनाने अमंलबजावणी करावी

3) महाराष्ट्रा मध्ये ओ. बी सी प्रमाणे एस. ई. बी. सी (मराठा समाज) प्रवर्गातील विद्यार्थीना प्रतिपुर्ती करावयाच्या इतर शुल्काबाबतची सवलत द्यावी

4) महाराष्ट्रामध्ये कुणबी प्रमाणपत्र देणेसाठी जिल्हा व तालूका पातळीवर समिती गठण करून या समितीमध्ये मराठा समाजाचे दोन प्रतिनिर्धीना समाविष्ट करून घ्यावे.

5) महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असणारे व परराज्यात शिकणा-या ओ बी सी प्रवर्गातील विद्यार्थीप्रमाणे शिष्यवृत्ती योजना मराठा समाजाला लागू करणे बाबत

6) महाराष्ट्रात ओ.बी.सी प्रमाणे एस. ई. बी. सी प्रवर्गातील युवक युवती करीता मोटर वाहन चालक व वाहक प्रशिक्षण योजना लागू करणेबाबत

7) मराठा आंदोलकावर दाखल झालेले गुन्हे मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार तसेच शासन निर्णया यानुसार तपासून मागे घेण्यात यावेत

8) मराठा समाजाला एस. ई. बी. सी प्रवर्गा अंर्तगत 10% आरक्षण लागू केले आहे. सद्या ते न्यायप्रविष्ट आहे. ते राज्य शासनाने न्यायालयामध्ये आपली वाजू भक्कम मांडून आरक्षण टिकवावे

9) मराठा भुषण आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ हे फक्त मराठा समाजाला लागू करावे. तसेच व्याज परतावा व इतर कर्ज प्रकरणे वेळेत पुर्ण करणेत यावीत

10) अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवस्मारकाचे काम तातडीने चालू करणेत यावे.

11) महाराष्ट्रातील गड-किल्ल्यांचे सवंर्धन करणेत यावे.

## साहित्य संमेलनाचे सूप वाजले, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची तूफान फटकेबाजी

**नवी दिल्ली, दि. २३ वृत्तसंस्था**

९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा समारोप कार्यक्रम आज पार पडला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांच्यासह अनेक दिग्गज नेते आणि साहित्यिक या कार्यक्रमाला उपस्थित होते. या कार्यक्रमात अजित पवार यांनी आधी भाषण केलं. यावेळी अजित पवार यांनी एकनाथ शिंदे यांच्या हलक्यात घेऊ नका या वक्तव्याचा उल्लेख केला. "आमच्यात कुठलीही नाराजी नाही. आता परवाच एकनाथ शिंदे यांनी असा शब्द वापरला की, मला हलक्यात घेऊ नका. ते कुणाला म्हणाले तेच कळायला मार्ग नाही. आता हलक्यात मशालीने घ्यायचं नाही की अजून कुणी घ्यायचं नाही?", असा सवाल अजित पवारांनी केला. त्यांच्या या वक्तव्याला एकनाथ शिंदे यांनी आपल्या भाषणात प्रत्युत्तर दिलं.



"खरं म्हणजे अजित दादा मगाशी म्हणाले की, आपल्या चेहऱ्यावर क्लोज कॅमेरा लावतात ते इथे समोर बसलेले आहेत. मगाशी अजित दादा म्हणाले, हलक्यात घेऊ नका. पण ते अडीच वर्षापूर्वीचं आहे", असं एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केलं. याचाच अर्थ एकनाथ शिंदे यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधल्याचं स्पष्ट केले.

"थोर सेनानी दिल्लीचे तख्त राखणारे महादजी शिंदे यांना ब्रिटिशांनी देखील ग्रेट मराठा म्हटलं होतं. त्यांच्या नावाचा पुरस्कार मला देण्यात आला. तो पुरस्कार मिळावं एवढं थोर काम मी केलं नव्हतं. पण माझी अशी प्रामाणिक भावना आहे की, मी एक कार्यकर्ता म्हणून काम करतोय. पण त्या पुरस्काराचा लौकीक वाढेल, असंच काम माझ्या हातून व्हावं, यासाठी हा एकनाथ महाराष्ट्र भूमीच्या विकासासाठी सदैव झटत राहणार एवढंच वचन या ठिकाणी देतो", असं एकनाथ शिंदे म्हणाले.

"थोर सेनानी दिल्लीचे तख्त राखणारे महादजी शिंदे यांना ब्रिटिशांनी देखील ग्रेट मराठा म्हटलं होतं. त्यांच्या नावाचा पुरस्कार मला देण्यात आला. तो पुरस्कार मिळावं एवढं थोर काम मी केलं नव्हतं. पण माझी अशी प्रामाणिक भावना आहे की, मी एक कार्यकर्ता म्हणून काम करतोय. पण त्या पुरस्काराचा लौकीक वाढेल, असंच काम माझ्या हातून व्हावं, यासाठी हा एकनाथ महाराष्ट्र भूमीच्या विकासासाठी सदैव झटत राहणार एवढंच वचन या ठिकाणी देतो", असं एकनाथ शिंदे म्हणाले.

त्याआधी उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, "आम्ही एकाच व्यासपीठावर असलो तरी आमच्याकडे क्लोज कॅमेरे असतात. आमच्या देहबोलीचा अभ्यास सुरु होतो. ते बघत असतात की, आमच्या चेहऱ्यावर हास्य आहे का? मी आल्यावर मुद्दाम तारा आक्कांशी मला काही बोलायचं होतं ते बोलत होतो. त्यामध्ये एकनाथ शिंदे मला काही सांगत होते. मी सुद्धा त्यांच्यासोबत काही बोलत होतो. पण हे सगळं करत असताना मी तर माझ्या मनाला सांगतोय की, ए बाबा कार्यक्रम संपेपर्यंत आपला चेहरा प्रसन्न दिसला पाहिजे. तो प्रयत्न आम्ही करतो. उगीच कुठलीही बातमी व्हायला नको", असं अजित पवार मिश्किलपणे म्हणाले.

## संतोष देशमुख हत्या प्रकरण: जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत सत्कार स्वीकारणार नाही - धसांची भूमिका

**धाराशिव, दि. २३ प्रतिनिधी**

संतोष देशमुख हत्या प्रकरणात जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत स्वागत सत्कार स्वीकरणार नाही, अशी भूमिका भाजप आमदार सुरेश धस यांनी घेतली आहे. धाराशिव येथील कार्यक्रमात आमदार सुरेश धस यांनी सत्कार नाकारल्याचे पाहायला मिळाले. मंत्री जयकुमार गोरे यांची धाराशिव जिल्हा संपर्क प्रमुख म्हणून नियुक्ती आणि भाजप नेते सुजितसिंह ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सत्कार समारंभात सुरेश धस बोलत होते. यावेळी भाजप आमदार सुरेश धस हे कार्यक्रमाला व्यासपीठावर उपस्थित होते, मात्र त्यांनी सत्कार स्वीकारण्यास नकार दिला.

दरम्यान, भाजप आमदार सुरेश धस यांनी 22 फेब्रुवारीला मस्साजोग गावात जाऊन संतोष देशमुख कुटुंबियांची भेट घेतली होती. संतोष देशमुख हत्या प्रकरणात आकाचे आका म्हणत सुरेश धस यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्याविरोधात जोरदार राळ उडवून दिली. मात्र काही दिवसांपूर्वी त्यांनी त्याच धनंजय मुंडेंची दोन वेळा भेट घेतल्याचं उघड झाल्यावर सुरेश धस प्रचंड टीकेचे धनीही झाले होते.

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष पंडितराव देशमुख यांचं 9 डिसेंबर 2024 रोजी अपहरण करण्यात आलं आणि त्यानंतर त्यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर केज आणि मस्साजोग या ठिकाणी आंदोलन करण्यात आलं होतं. संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांसह मस्साजोगच्या ग्रामस्थांनीही या हत्या प्रकरणाचा लवकरात लवकर तपास करुन आरोपींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. डोणगावच्या टोलनाक्यावर अचानक एका चारचाकी गाडीकडून संतोष देशमुख यांच्या गाडीला अडवण्यात आलं होतं. त्या गाडीतून 5 ते 6 तरुण खाली उतरले आणि संतोष देशमुखांच्या गाडीवर दगडफेक करु लागले. त्यानंतर त्यांनी संतोष देशमुखांना गाडीतून खाली ओढून काढ्या, लोखंडी रॉड तसंच कोयत्यानं मारहाण करायला सुरुवात केली आणि लगेचच त्यांच्या गाडीत टाकून घेऊन गेले. त्यानंतर देशमुखांची आरोपींनी हत्या केल्याची घटना घडली होती. या घटनेवरुन राजकी वातावरण चांगलच तापलं आहे. विशेष म्हणजे भाजप आमदार सुरेश धस यांनी हे प्रकरण चांगलच लावून धरलं आहे.

## काही नेत्यांचा एक गट तयार झाला आहे, जे हिंदू धर्माची खिल्ली उडवतात - पंतप्रधान

**छतरपूर, दि. २३ वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज बागेश्वर धाम येथे आले होते. त्यांनी येथे बालाजी मंदिरात पूजा केली. यानंतर, व्यासपीठावरून बटन दाबून 'बागेश्वर धाम मेडिकल अँड सायन्स रिसर्च इंस्टिट्यूट'चे भूमिपूजन केले. या रुग्णालयाचा कर्करोग पीडीत आणि इतर आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांना मोठा लाभ होईल. यावेळी मोदी म्हणाले, "बंधूंनो, आजकाल काही नेत्यांचा एक गट तयार झाला आहे, जे धर्माची खिल्ली उडवतात. हिंदूंच्या श्रद्धांचा द्वेष करतात. आपल्या श्रद्धा, संस्कृती आणि मंदिरांवर हल्ला करतात आणि आपल्या सणांबद्दल आणि परंपरांबद्दल अपशब्द बोलत असतात."

पंतप्रधान पुढे म्हणाले, "माझे छोटे बंधू धीरेंद्र शास्त्री लोकांना जागरूक करत असतात. एकतेचा मंत्र देत असतात. आता त्यांनी हे कर्करोग रुग्णालय उभारण्याची जबाबदारीही घेतली आहे. अर्थत आता बागेश्वर धाममध्ये भजन, भोजन आणि निरोगी जीवनाचा आशीर्वादही मिळेल. या कामासाठी मी धीरेंद्र शास्त्री यांचे अभिनंदन करतो."



यावेळी, बागेश्वर सरकार धीरेंद्र कृष्ण शास्त्री आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव देखील उपस्थित होते. बागेश्वर धाम मध्य प्रदेशातील छतरपूर जिल्यात आहे.

पंतप्रधान मोदी म्हणाले, "मला फार कमी दिवसांतच दुसऱ्यांदा वीरांची भूमी असलेल्या बुंदेलखंडात येण्याचे सौभाग्य लाभले. यावेळी थेट बालाजींकडूनच बोलावणे आले. हनुमानजींच्या आशीर्वादाने, हे श्रद्धेचे केंद्र आता आरोग्याचे केंद्र बनणार आहे. मी येथील बागेश्वर धाम कर्करोग वैद्यकीय आणि विज्ञान संशोधन संस्थेचे भूमिपूजन केले. ही संस्था १० एकर एवढ्या परिसरात असेल. पहिल्या टप्प्यातच येथे १०० खाटांची सुविधा मिळेल. याबद्दल मी बुंदेलखंडच्या जनतेचे अभिनंदन करतो.

बागेश्वर धामचे हे नवीन रुग्णालय २५२ कोटी रुपये खर्चून बांधले जाणार आहे. हे रुग्णालय २.३७ लाख चौरस फूट जागेत बांधण्यात येणार आहे. या इमारतीत नैसर्गिक प्रकाश आणि कमीत कमी आवाज असेल. तसेच या रुग्णालयाचा आकार पिरॅमिडसारखा असेल.

## धंगेकरांना ताकदीने काम करायचे असेल तर एकनाथ शिंदेंशिवाय पर्याय नाही - उदय सामंत

**मुंबई,दि. २३ प्रतिनिधी**

गेल्या अनेक दिवसांपासून ठाकरे गटाला लागलेली गळती थांबताना दिसत नाही. संपूर्ण राज्यातून ठाकरे गटाचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते उद्धव ठाकरे यांना जय महाराष्ट्र करून पक्षाला सोडचिठ्ठी देत आहेत आणि शिवसेना शिंदे गटात प्रवेश करत आहेत. या घडामोडी सुरू असतानाच ठाकरे गटाने काँग्रेसला जोरदार धक्का दिला आहे. काँग्रेसच्या एका जिल्हाध्यक्षाने पक्षाला रामराम करत ठाकरे गटात प्रवेश केला. यातच काँग्रेसचे माजी आमदार रवींद्र धंगेकर शिवसेना शिंदे गटात प्रवेश करणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे. या चर्चांवर रवींद्र धंगेकर यांनी स्पष्टीकरण दिले आहे. रिल टाकण्याचे माझ्या मनात होते. शिवजयंतीचे वातावरण होते आणि त्या वातावरणात फोटो चांगला होता. गळ्यात भगवा रुमाल होता. त्या फोटोवरून माध्यमांमध्ये चर्चा सुरू झाली आणि वातावरण असे झाले की, मी शिवसेनेत चाललो आहे. भगव्या उपरण्यातच जन्म झाला आहे. मी हिंदू धर्मात जन्मलो आहे. मी मानवता कार्यकर्ता आहे, असे रवींद्र धंगेकर यांनी म्हटले आहे. उदय सामंत यांनी यावर भाष्य करताना पुन्हा एकदा रवींद्र धंगेकर यांना शिवसेना शिंदे गटात येण्याबाबत सुचवले आहे.

पत्रकारांशी बोलताना उदय सामंत म्हणाले की, रवींद्र धंगेकर यांनी भगवा मफलर आणि भगवी टोपी घालून स्टेटस ठेवले. त्यावर मी सांगितले आहे की, त्यावर जर धनुष्यबाण आला, तर आम्हाला आवडेल. त्यांना आधीच निमंत्रण दिले आहे. त्यांच्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला ताकदीने काम करायचे असेल, सामाजिक क्षेत्रात काम करायचे असेल, तर एकनाथ शिंदे यांच्याशिवाय पर्याय नाही, असे सांगत उदय सामंत यांनी पुन्हा एकदा रवींद्र धंगेकर यांना खुली ऑफर दिली.

दरम्यान, यापूर्वी उदय सामंत यांनी दिलेल्या ऑफरवर बोलताना रवींद्र धंगेकर म्हणाले की, त्यांना वाटते असेल की, आपला मित्र जवळ असला पाहिजे. कोणालाही तसे वाटते. माझा स्वभाव चांगला आहे. त्यामुळे ऑफर देणे काही चुकीचे नाही. मी कार्यकर्त्यांशी बोलेन. माझ्या डोक्यात अजून काही नाही. पण, जाताना काही लपून जाणार नाही. मला सगळ्यांशी बोलावे लागेल, असे रवींद्र धंगेकर यांनी म्हटले आहे.

# अण्णा हजारेंचे 'सिलेक्टिव' बोलणे शंका उपस्थित करणारे-हेमंतपाटील

### भ्रष्टाचाराच्या अनेक प्रकरणावर अण्णा गप्प

■ **महासागर प्रतिनिधी,**
**पुणे, दि. २३ :** भ्रष्टाचाराच्या मुद्दयावर देशात, परिवर्तनाचे आंदोलन उभे करणारे अण्णा हजारे हे प्रत्येकांसाठीच आदर्श ठरावे, असे व्यक्तीमत्व आहे. गेल्या काही काळात अण्णांनी स्वत:ला आंदोलन आणि इतर मुद्द्यांपासून अलिप्त ठेवले होते. विशेष म्हणजे लोकसभा निवडणुकीपूर्वी देशात गाजलेला निवडणूक रोखे प्रकरण असो अथवा गौतम अदाणी यांच्या प्रकरणावर सोयीस्कर रित्या अण्णा गप्प होते. आता अण्णांनी भ्रष्टाचारी मंत्र्यांनी राजीनामा द्यावेत, अशी मागणी केली आहे. परंतू, काही निवडक मुद्दयांवर



अण्णांचे बोलणे शंका उपस्थित करणारे आहे, असे मत इंडिया अगेन्स्ट करप्शनचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि ओबीसी नेते हेमंत पाटील यांनी आज, रविवारी (ता.२३) व्यक्त केले.

काही मुद्द्यांवर ठरवून प्रतिक्रिया व्यक्त करीत राजकीय वातावरण ढवळून काढण्याचा प्रयत्न अण्णांकडून केला जातो, असा थेट आरोप पाटील यांनी केला आहे. त्यांनी व्यक्त केलेल्या प्रतिक्रिया लक्षात घेता काहींना राजकीय फायदा पोहचवण्याचा प्रयत्न असल्याचे स्पष्ट लक्षात येते. परंतु, मोजके राजकीय पक्ष आणि नेत्यांना अण्णांकडून लक्ष केले जाते, असा आरोप पाटील यांनी केला.

मंत्रिमंडळात असलेल्या मंत्र्यांवर आरोप झाल्यावर नैतिकतेचे पालन करीत त्यांनी सर्वप्रथम राजीनामा दिलाच पाहिजे, यात दुमत नाही.

परंतू, अण्णांचा हेतू शुद्ध असेल तर, गेल्या काही काळात राज्यासह देशात समोर आलेल्या भ्रष्टाचाराच्या मुद्द्यांवर ते गप्प का होते? असा सवाल पाटील यांनी उपस्थित केला.

आरोप असलेल्या नेत्यांना मंत्रिमंडळात घेण्याआधी विचार करणे गरजेचे आहे, असा सल्ला अण्णांनी राज्यकर्त्यांना दिला आहे. परंतू, राज्य मंत्रिमंडळ स्थापन होत असतांना अण्णांनी आता घेतलेला पवित्रा का घेतला नाही, असा प्रश्न देखील पाटील यांनी विचारला आहे. अण्णांची भूमिका तटस्थ नसून 'सोयीस्कर' राजकारणाची आहे. इतर वेळी अण्णांचे काहीही न बोलने सर्वसामान्यांच्या मनात त्यांची प्रतिमा डागाळण्यासाठी कारणीभूत ठरू शकते, असे मत पाटील यांनी व्यक्त केले.

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या वरिष्ठ उपाध्यक्षपदी अनिल पाटील आणि लहू कानडे यांची नियुक्ती

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. २३ :** राष्ट्रवादी काँग्रेसने पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसाठी दोन वरिष्ठ नेत्यांची महत्त्वपूर्ण नियुक्ती जाहीर केली आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी आज माजी मंत्री अनिल भाईदास पाटील आणि माजी आमदार लहू कानडे यांना 'वरिष्ठ उपाध्यक्ष' पदाची जबाबदारी सोपवली आहे.

**राष्ट्रवादी काँग्रेसने पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसाठी दोन वरिष्ठ नेत्यांची महत्त्वपूर्ण नियुक्ती जाहीर केली आहे.**

या नियुक्तीनंतर पक्षाच्या अधिकृत घोषणेनुसार, अनिल भाईदास पाटील यांच्यावर धुळे, नंदुरबार आणि जळगाव जिल्ह्यांच्या प्रभारी पदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. तर लहू कानडे यांना पक्षाच्या सामाजिक न्याय विभागाच्या प्रभारी पदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी या दोन्ही नियुक्त्या पक्षाच्या संघटनात्मक मजबुतीसाठी आणि राज्यभरात पक्षाची विचारधारा पोहोचवण्यासाठी महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. त्यांनी अनिल पाटील आणि लहू कानडे यांच्याकडून पक्षवाढीच्या दृष्टीने प्रभावी कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली आहे.पक्षाच्या धोरणांना जनसामान्यांपर्यंत पोहोचवून पक्षवाढीला चालना देण्याचे आवाहनही प्रदेशाध्यक्ष तटकरे यांनी या नेत्यांना केले आहे. त्याचबरोबर, या नवीन जबाबदाऱ्यांसाठी दोघांनाही शुभेच्छा देत पक्षाच्या यशासाठी त्यांनी योगदान द्यावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

# राज्यातील बाजार समित्यांची राज्यस्तरीय परिषद पुण्यात

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. २३ :** राज्यातील बाजार समित्यांच्या कामकाजात सुधारणा आणि आधुनिकरणासाठी सोमवारी पुण्यात राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने बाणेर येथील बंटारा भवन येथे पार पडणार असून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते तिचे उद्घाटन होईल.



पणन मंत्री जयकुमार रावल यांनी या परिषदेबाबत माहिती देताना सांगितले की, राज्यातील सर्व बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती, संचालक आणि सचिव या परिषदेत सहभागी होणार आहेत. कृषी मंत्री माणिकराव कोकाटे, सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रविण दराडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

बाजार समित्यांच्या आधुनिकीकरणावर भर

राज्यात ३०५ बाजार समित्या आणि ६२३ उपबाजार कार्यरत असून, गेल्या ४० वर्षांपासून त्या शेतमालाच्या विक्री व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग आहेत. मात्र, बदलत्या काळानुसार बाजार समित्यांच्या आधुनिकीकरणावर भर देण्याची गरज असल्याने या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

या परिषदेत शेतमालाच्या विपणनामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, निर्यात सुविधा केंद्रांची उभारणी, बाजार समित्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी उपाययोजना आणि दैनंदिन अडचणींवर चर्चा होणार आहे.

### कृषी पणन व्यवस्थेत सुधारणा

**राज्यात कृषी पणन व्यवस्थेत सुसूत्रता आणि समन्वय आणण्यासाठी विविध प्रकल्प आणि योजना राबवण्यात येत आहेत. कृषी पणन मंडळाच्या वतीने बाजार समित्यांच्या पदाधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण आणि कार्यशाळांचे आयोजनही करण्यात येते.**

**या परिषदेच्या माध्यमातून राज्यातील बाजार समित्यांना सक्षम करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेतले जातील, अशी माहिती महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली.**

# राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन ३ मार्चपासून मुंबईत

### १० मार्च रोजी अर्थसंकल्प सादर

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. २३ :** राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सोमवार, दि.३ मार्च ते बुधवार, दि. २६ मार्च २०२५ या कालावधीत मुंबई येथे होणार आहे. राज्याचा अर्थसंकल्प १०मार्च रोजी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात सादर केला जाईल.



विधानभवन, मुंबई येथे रविवारी विधानसभा आणि विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीची बैठक पार पडली.

या बैठकीत अधिवेशनाच्या कामकाजाबाबत चर्चा करण्यात आली.

या बैठकीला विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील तसेच मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, गिरीश महाजन, शंभुराज देसाई, आमदार प्रसाद लाड, प्रवीण दरेकर, ड. अनिल परब, हेमंत पाटील, श्रीकांत भारतीय, छगन भुजबळ, जितेंद्र आव्हाड, डॉ. नितीन राऊत, रणधीर सावरकर, अमिन पटेल, विधिमंडळ सचिव जितेंद्र भोळे आणि विलास आठवले यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे या दूरदृष्य प्रणालीद्वारे सहभागी झाल्या होत्या.

अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या कालावधीत शनिवार, दि. ८ मार्च २०२५ रोजी सार्वजनिक सुटी असूनही विधिमंडळाचे कामकाज सुरू राहणार आहे. तसेच, दि. १३ मार्च २०२५ रोजी होळीच्या निमित्ताने विधिमंडळाच्या कामकाजाला सुटी देण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

# शिंदे गटाच्या नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या पुण्यातील निवासस्थानाबाहेर ठाकरे गटाच आंदोलन

■ **महासागर प्रतिनिधी,**
**पुणे, दि. २३ :** दिल्लीत४८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सुरु आहे. या संमेलनात असे घडलो आम्ही या कार्यक्रमादरम्यान ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडीज दिल्या की, एक पद मिळायचं, असं वादग्रस्त विधान शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले. त्यानंतर महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.




नीलम गोऱ्हे यांच्या या विधानानंतर ठाकरे गटाचे शिवसैनिक आक्रमक झाल्याचं पाहण्यास मिळत असून पुण्यातील शिवाजीनगर भागातील मॉडेल कॉलनी येथील उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्या निवासस्थानाबाहेर ठाकरे गटाकडून आंदोलन करण्यात आले. शिवसैनिकांकडून स्वतःच्या गाडीचे टायर बदलून घेणाऱ्या टायरवाल्या काकू, तुमच्या काळ्या टायरचा जाहीर निषेध अशा आशयाचा मजकूर असलेला फ्लेक्स घेऊन महिला कार्यकर्त्या आंदोलनात सहभागी झाल्या होत्या.

यावेळी महिला आघाडीच्या नेत्या रेखा कोंडे म्हणाल्या, शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे, उद्धव ठाकरे यांनी नीलम गोऱ्हे यांना विधान परिषदेवर सलग चार वेळा पाठविले. नीलम गोऱ्हे यांना पक्षाने सर्व काही दिले, पण त्या शेवटी गद्दार गटात गेल्याच पण त्याही पुढे जाऊन नीलम गोऱ्हे यांनी आज उद्धव ठाकरे यांच्या बद्दल जे विधान केले आहे आम्ही त्याचा निषेध व्यक्त करीत असून, नीलम गोऱ्हे यांनी नाक घासून माफी मागितली पाहिजे, अन्यथा यापुढे अधिक तीव्र आंदोलन करू, असा इशारादेखील त्यांनी यावेळी दिला.

# मालेगावजवळ मालमोटार रिक्षावर उलटून तीन जण ठार

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. २३ :**मालेगाव : येथून जवळच असलेल्या दरेगाव शिवारात शनिवारी सकाळी साडे अकरा वाजेच्या सुमारास मालमोटार ऑटो रिक्षावर उलटून झालेल्या अपघातात तीन जण जागीच ठार झाले असून२ जण जखमी झाले आहेत. जखमींना येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. राष्ट्रीय महामार्गावरील दरेगाव जवळील पर्यायी वळण रस्त्याने मालेगावकडून चाळीसगाव चौफुलीकडे प्रवाशी घेऊन ऑटो रिक्षा जात होती. त्याचवेळी कापडाच्या गाठी भरलेली विरोधी दिशेने येणारी मालमोटार या रिक्षावर अचानक पलटली. यात रिक्षा मालमोटारीखाली दाबली गेली. रिक्षामधील प्रवासी त्यात अडकले. अपघात घडल्याचे समजताच स्थानिकांनी मदतकार्य सुरू केले. नागरिकांनी मालमोटारीत अडकलेला चालक व सहाय्यकाला आधी बाहेर काढले. दरम्यान, पोलीस घटनास्थळी दाखल झाले. क्रेनच्या सहाय्याने अपघातग्रस्त मालमोटार हटविल्यानंतर रिक्षामधील तीन जणांचा जागीच मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले. अब्दुल कलाम अब्दुल मनान ४७, अल्कमा मुख्तार खान (२५), व सना कौसर मोहंमद युसुफ (२४) अशी या अपघातातील मृतांची नावे असून ते मालेगावचे रहिवाशी आहेत. अब्दुल हा रिक्षा चालक आहे.



या अपघातात मालमोटार चालक व त्याचा सहाय्यक असे दोघे जखमी झाले असून त्यांना येथील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या प्रकरणी पवारवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे.

# इंदापूर तालुक्यात ज्वारीच्या काढणीला वेग : मात्र खळी नामशेष

■ **महासागर प्रतिनिधी,**
**इंदापूर, दि. २३ :** पुणे जिल्ह्याचा पूर्व भागातील इंदापूर, दौंड, बारामती व सोलापूर जिल्ह्याच्या पश्चिम भागातील करमाळा ,माळशिरस तालुक्यात ज्वारी पिकाच्या काढणीला आता वेग आला आहे . उजनी धरणाच्या निर्मितीनंतर करमाळा आणि इंदापूर तालुक्यातील मोठे क्षेत्र उजनीच्या पाणलोट क्षेत्रातील उपसा जलसिंचन योजनेच्या माध्यमातून ओलिताखाली आले. त्यामुळे शेतकरी केळी, ऊस, पेरू, डाळिंब आदी नगदी पिकाकडे वळाल्याने ज्वारीच्या क्षेत्रामध्ये मोठी घट झाली असून पारंपारिक ज्वारी आता केवळ आठमाही व कोरडवाहू क्षेत्रातच घेतली जात आहे.



पुणे जिल्ह्याचा पूर्व भाग दौंड इंदापूर, बारामती सोलापूर जिल्ह्याचा पश्चिम भाग हा एकेकाळी ज्वारी पिकासाठी आगार मानला जात असे. निरा आणि भीमा नदीच्या खोऱ्यामध्ये ज्वारीच्या पिकाला एक अनन्यसाधारण महत्त्व होते.सिंचन व्यवस्था अपुरी असल्यामुळे थोडक्या पाण्यामध्ये येणाऱ्या व दररोजच्या आहारामध्ये सर्रास वापर होणाऱ्या ज्वारीची पिके मोठ्या प्रमाणामध्ये घेतली जात होती. त्याचवेळी केवळ ज्वारी हे पीकच शेतकऱ्यांचे बाजारपेठेतील पत निर्माण करीत होते. शेतकरी ज्वारीची विक्री करून आलेल्या पैशातून आपला उदरनिर्वाह व कडबा विक्रीतून आलेल्या पैशातून दैनंदिन गरजा भागवत असे .व घरी खाण्यासाठी सालचंदीव घरातील जनावरांसाठी चारा म्हणून कडब्याचा मोठा वापर होत असे. कडबा विक्रीसाठी मोठ्या गावामध्ये कडब्याचा मोठा बाजार भरत असे. सन १४७२ मध्ये महाराष्ट्रात पडलेल्या भीषण दुष्काळामध्ये ज्वारी धान्याला जिल्हा बंदी करण्यात आली होती. त्यावेळी भीमा नदीच्या खोऱ्यामध्ये सोलापूर जिल्ह्यातून पुणे जिल्ह्यात खुष्कीच्या मार्गाने शेतकरी, व्यापारी ज्वारी आणत असत. अशी आठवण जुन्या काळातील शेतकरी अजूनही सांगतात. अलीकडच्या काळामध्ये ज्वारीचे क्षेत्र घटल्यामुळे ज्वारी सुद्धा महाग विकली जात असून कडब्याचे भावही गगनाला भिडले आहेत. ज्वारी काढण्यासाठी अत्यंत कष्ट करावे लागते. हाताला फोड येतात. त्यामुळे ज्वारी काढण्यासाठी मजूर मिळत नाहीत. पिकाची पक्ष्यांपासून राखण करणे हे कामही महिनाभर चालते. ज्वारी काढणे, पेंढ्या बांधणे, खुडणे ,मळणी करणे त्या तुलनेमध्ये पाठीमागील वीस वर्षांपूर्वी ज्वारीला नगण्य बाजारभाव मिळत असल्याने शेतकऱ्यांनी परवडत नसल्याने कानाडोळा केला असल्याचे दिसून येते. आता हाताच्या बोटावर मोजण्या इतपतच गावोगावी शेतकरी ज्वारीची पिके घेतात. आता ज्वारीच्या मळणीसाठी मळणी यंत्र मोठ्या प्रमाणामध्ये उपलब्ध असल्यामुळे मळणी यंत्रावर ज्वारी केली जाते. परंतु एकेकाळी ज्वारी करण्यासाठी शेतकरी आपल्या शेतामध्ये, घराच्या आजूबाजूला जिथे चांगली जागा असेल त्या ठिकाणी ज्वारीची मळणी करण्यासाठी खळी तयार करीत असत.

पंचवीस- तीस फूट गोल वर्तुळाकार जमीन खणून ,त्यावर पाणी टाकून बैलांच्या पायाने तुडवून खळी केली जात असत. त्यावर शेणाचे सारवण केल्यावर खळे तयार होते असत. याच खळ्यात ज्वारीची कणसं टाकून बैलाच्या साह्याने खळ्यामध्ये कणसांवर बैल गोल-गोल फिरवून ज्वारी बैलांच्या पायाने तुडवली जात असे. त्या कणसांतून ज्वारी मोकळी करून उफणली जात असे. या ज्वारीला मदन म्हणत असत हे मदन ओपन ने मोठे जिकिरीचे काम असे. ज्वारीची कुस अंगाला लागल्यास त्याची भयंकर खाज सुटत असल्याने ज्वारी उफणण्याच्या कामाला तर घरातील सर्व मंडळी खळ्यामध्ये काम करत असत.अशा पद्धतीची पारंपारिक खळी गावच्या शिवारास सुगी सराईच्या दिवसात हमखास आढळून येत असत. मात्र शेती सुधारणाच्या काळात आधुनिक तंत्रज्ञान आल्याने वेगवेगळ्या प्रकारच्या मळणी यंत्र उपलब्ध झाली .शेतकरी आता मळणी यंत्राकडूनच ज्वारी करणे पसंत करत असल्याने अशा प्रकारची खळी आता नामशेष झाली आहेत. अलीकडील वीसेक वर्षात तर परिसरामध्ये एकही खळे आढळून आले नाही.

शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये खळ्याला एक विशेष महत्त्व होते. बाजारपेठेतून काही वस्तू शेतकऱ्याने उधार आणल्या तर त्याचे देणे, मी ज्वारीच्या खळ्यावर नक्की देईन. दुकानदारांना अशी खळ्याची हमी दिली जात होती. असे काही व्यवहार ज्वारीच्या खळ्यांशी गुंतले होते. मात्र आता ही खळी गावच्या शिवारातून हद्दपार झाली आहेत.

## बेदरकारपणामुळे मोटारचालक महाविद्यालयीन तरुणाचा मृत्यू, कात्रज बाह्यवळण मार्गावर अपघात

■ **महासागर प्रतिनिधी,**
**पुर्णे, दि. २३ :** बेदरकारपणामुळे मोटारचालक महाविद्यालयीन तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना कात्रज-मंतरवाडी बाह्यवळण मार्गावर घडली. भरधाव मोटार डोंगर कपारीवर आदळून तरुणाचा मृत्यू झाला. अपघातात मोटाराचा चुराडा झाला. भरधाव वेगामुळे अपघात घडल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# नाशिक जिल्ह्यातील राहुड घाटात विचित्र अपघात मालमोटारीची तीन वाहनांना धडक, एक ठार, २० जखमी

■ **महासागर प्रतिनिधी,**
**नाशिक, दि. २३ :** मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावरील राहुड घाटात शुक्रवारी रात्री झालेल्या विचित्र अपघातात एका महिलेचा मृत्यू झाला तर, २० जण जखमी झाले. घाटातील उताराच्या रस्त्यावर मालमोटारीचे ब्रेक निकामी झाल्याचा अंदाज आहे. या मालमोटारीने समोरील तीन वाहनांना उडवले.



महामार्गावर चांदवड-मालेगाव दरम्यान राहुड घाट आहे. रात्री दहा वाजेच्या सुमारास घाटात हा अपघात झाल्याची माहिती चांदवडचे तहसीलदार मंदार कुलकर्णी यांनी दिली. भरधाव मालमोटारीची धडक जबरदस्त होती की अन्य वाहनांचा अक्षरशः चक्काचूर झाला. या अपघातात उषा देवरे (४६ मालेगाव) यांचा जागीच मृत्यू झाला. तर वेगवेगळ्या वाहनांतील२० जण जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना चांदवडच्या ग्रामीण रूग्णालयात पाठविण्यात आले.

प्राथमिक उपचारानंतर काहींना मालेगाव व इतरत्र खासगी रूग्णालयात नेण्यात आले.अपघातामुळे महामार्गावरील एका बाजुची वाहतूक ठप्प झाली होती.

घाटातील उतारावर मालमोटारीचा ब्रेक निकामी होऊन हा अपघात झाल्याचा अंदाज प्रत्यक्षदर्शींकडून व्यक्त होत आहे. इको व स्विफ्ट मोटारीसह मालवाहू वाहनाचे मोठे नुकसान झाले.

## फ्लॉवर, कोबी, मटार, तोतापुरी कैरीच्या दरात घट

**पुणे :** मागणी कमी झाल्याने कांदा, कोबी, मटार, फ्लॉवर, तोतापुरी कैरीच्या दरात १० ते १५ टक्क्यांनी घट झाली. अन्य फळभाज्यांची स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.



श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात रविवारी राज्य, तसेच परराज्यातून मिळून १०० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेशातून मिळून १४ ते १५ टेम्पो हिरवी मिरची, कर्नाटक, गुजरातमधून मिळून ५ ते ६ टेम्पो कोबी, कर्नाटकातून घेवडा आणि पावटा प्रत्येकी ४ ते५ टेम्पो, १ टेम्पो भुईमूग शेंग, आंध्र प्रदेश, तमिळनाडूतून मिळून ५ ते ६ टेम्पो शेवगा, राजस्थानातून १० टेम्पो गाजर, तसेच ४ ते १० ट्रक मटार, गुजरात, मध्य प्रदेशातून १७ ते १८ टेम्पो लसूण अशी आवक परराज्यातून झाली, अशी माहिती मार्केट यार्डातील ज्येष्ठ अडते विलास भुजबळ यांनी दिली.

पुणे विभागातून सातारी आले ते गोणी, भेंडी ७ ते ८ टेम्पो, गवार ५ ते ६ टेम्पो, टोमॅटो १० हजार पेटी, हिरवी मिरची ४ ते ५ टेम्पो, ढोबळी मिरची १० ते १२ टेम्पो, काकडी ७ ते८ टेम्पो, कोबी ते टेम्पो, फ्लॉवर १'० ते १२ टेम्पो, तांबडा भोपळा १४ ते १५ टेम्पो, कांदा १५० ते १६० ट्रक, तसेच इंदूर, आग्रा, स्थानिक भागातून ४० टेम्पो बटाट्याची आवक झाली.

# उदय सामंत यांची राज ठाकरेंना सदिच्छा भेट, राजकीय चर्चेचे मात्र नाकारले स्पष्टीकरण

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. २३ :**

शिवसेना नेते आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांनी शनिवारी सकाळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची त्यांच्या शिवतीर्थ या निवासस्थानी भेट घेतली. ही भेट साधी सदिच्छा भेट होती आणि त्यात कोणतीही राजकीय चर्चा झालेली नाही, असे उदय सामंत यांनी भेटीनंतर स्पष्ट केले.

उदय सामंत यांनी सांगितले की, राज ठाकरे यांनी अलीकडेच विश्व मराठी साहित्य संमेलनाला उपस्थिती लावली होती. त्याबद्दल त्यांचे आभार मानण्यासाठी मी त्यांची भेट घेतली. यावेळी आम्ही मराठी भाषा, साहित्य संमेलन, दिल्लीत सुरू असलेल्या मराठी साहित्य संमेलनासंदर्भात चर्चा केली. मात्र, राजकीय चर्चेचा या भेटीशी काहीही संबंध नाही.

### महायुतीमध्ये मनसेला सहभागी करण्याचे प्रयत्न?

सामंत-ठाकरे भेटीनंतर विविध राजकीय चर्चांना उधाण आले आहे. मागील काही दिवसांपासून भाजप आणि शिवसेनेतील अनेक वरिष्ठ नेते राज ठाकरे यांची भेट घेत आहेत. विशेषतः आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मनसेला महायुतीमध्ये सहभागी करण्याचे प्रयत्न सुरू असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### शिवसेना-मनसे युतीबाबत स्पष्ट भूमिका

शिवसेना आणि मनसे युतीबाबत विचारले असता उदय सामंत यांनी हा विषय त्यांच्या कक्षेबाहेरचा असल्याचे सांगितले. युतीसंदर्भातील निर्णय उपमुख्यमंत्री आणि शिवसेना प्रमुख एकनाथ शिंदेच घेतील. मी त्या चर्चेत सहभागी नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

### पालकमंत्री पदाचा तिढा लवकरच सुटणार

नाशिक आणि रायगडच्या पालकमंत्री पदाचा तिढा अद्याप सुटलेला नाही. मात्र, येत्या दोन-तीन दिवसांत हा प्रश्न मार्गी लागेल, असे उदय सामंत यांनी सांगितले. अमित शहा आणि एकनाथ शिंदे यांच्यात नुकतीच बैठक झाली.

मात्र, ती केवळ प्रशासकीय कामांसंदर्भात होती, पालकमंत्री नियुक्तीसाठी नव्हती, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### धंगेकरांच्या भगव्या उपरण्यावर सूचक प्रतिक्रिया

काँग्रेसचे आमदार रविंद्र धंगेकर यांनी अलीकडेच भगवे उपरणे घेतले होते. त्याबाबत बोलताना उदय सामंत म्हणाले, भविष्यात जर त्या उपरण्यावर आमचा धनुष्यबाण दिसला, तर आम्हाला आनंदच होईल. त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चा रंगल्या आहेत.

### सामंत-ठाकरे भेटीमुळे चर्चांना उधाण

उदय सामंत आणि राज ठाकरे यांच्या भेटीने महायुतीमध्ये मनसेच्या संभाव्य सहभागाबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाल्या आहेत. मात्र, ही भेट केवळ सदिच्छा भेट असल्याचा पुनरुच्चार करत उदय सामंत यांनी या चर्चांना पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला आहे.

# पत्नीची हत्या करून पतीची आत्महत्या

**प्रेमविवाहाचा दुर्दैवी अंत | रहाटगाव शेतशिवारातील धक्कादायक घटना | सात महिन्यांपूर्वी झाला होता प्रेमविवाह**







**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि.23) -** सात महिन्यांपूर्वी आंतरजातीय विवाह करून सुखी संसाराची स्वप्नं रंगविणाऱ्या एका कुटुंबाचा दुर्दैवी शेवट झाल्याची घटना रविवारी (दि.23) नांदगाव पेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली. पत्नीची गळा आवळून हत्या केल्यानंतर पतीने स्वतः सुद्धा आत्महत्या करून जीवन संपवीली. अमोल सुरेशराव गायकवाड (35) व शिल्पा अमोल गायकवाड (32, दोन्ही रा. रहाटगाव) अशी मृतकांची नावे आहेत. या घटनेमुळे रविवारी सकाळी 8 वाजताच्या सुमारास रहाटगाव परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे.

> पत्नीची हत्या करून पतीने आत्महत्या केल्याचे प्राथमिक तपासात दिसून येत आहे. महिलेच्या डोक्याला अंतर्गत दुखापत झाल्याचा प्राथमिक अंदाज डॉक्टरांनी दिला आहे. परंतू शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर नेमके मृत्यूचे कारण स्पष्ट होईल. या घटनेच्या अनुषंगाने सद्यास आकस्मिक मृत्युची नोंद केली आहे. चौकशी व शवविच्छेदन अहवालानंतर पुढील कायदेशिर कारवाई होईल.
>
> **महेंद्र अंभारे,**
> पोलिस निरीक्षक, नांदगाव पेठ ठाणे.

या घटनेमागील मूळ कारण अद्याप पुढे आले नाही, त्यामुळे नांदगाव पेठ पोलीस सर्वच बाजूने तपास करीत आहे.

माहितीनुसार, मुळचे धामणगाव तालुक्यातील वाठोडा व सध्याचे रहाटगाव येथील रहिवासी अमोल सुरेशराव गायकवाड आणि रामगाव येथील शिल्पा अमोल गायकवाड यांचा सात महिन्यांपूर्वी आंतरजातीय विवाह झाला होता. कल्पदीप मंगलकार्यालय मागे असलेल्या जिल्हा पुरवठा कार्यालयातील पुरवठा निरिक्षक प्रज्वल विठ्ठलराव पाथरे यांच्या शेतात अमोलचे वडील रखवालदारी आणि मजुरी करत होते. त्याठिकाणी असलेल्या दुमजली फार्म हाऊसमध्ये अमोल आणि शिल्पा तसेच अमोलचे वडील सुद्धा वास्तव्यास होते. दोन दिवसांपूर्वी अमोलचे वडील बाहेरगावी गेले होते आणि रविवारी सकाळी परत आल्यानंतर त्यांनी मुलगा आणि सुनेला आवाज दिला. मात्र त्यांना प्रत्युत्तर न मिळाले नाही. त्यामुळे अमोलच्या वडिलांनी खोलीत जाऊन बघितले असता, खोलीत पलंगावर शिल्पाचा मृतदेह दिसला, तर तर अमोल हा गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला.

त्यांनी लगेच या घटनेची माहिती डायल 112 वर या क्रमांकाच्या फोन दिली. त्यानंतर काही वेळातच पोलिसांनी घटनास्थळी पाचारण केले. पोलिसांनी दोघांचेही मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयात शवविच्छेदनाकरिता पाठविले आहे.

### श्वान पथक, फॉरेन्सींकचा चमु दाखल

या घटनेची माहिती मिळताच नांदगाव पेठ पोलीस स्टेशनचे ठाणेदार महेंद्र अंभोरे यांनी तत्काळ पोलिसांचा ताफा घेऊन घटनास्थळ गाठले. त्यानंतर श्वान पथक व फॉरेन्सीक टीमला सुध्दा यावेळी पाचारण करण्यात आले. पोलीस उपायुक्त सागर पाटील, फ्रेजरपुरा विभागाचे एसीपी कैलास पुंडकर हे सुध्दा घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा करून शिल्पा व अमोल यांचे मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवले. घटनेबाबत प्रमुख कारण अद्याप स्पष्ट नाही. अमोल ने शिल्पाची हत्या का केली असावी? स्वत: गळफास का घेतला? की अजून काही घातपात झाला याबाबत सर्वच बाजूने पोलीस तपास करीत आहे.पोलीस निरीक्षक महेंद्र अंभोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय कवडे तपास करीत आहे.

### सुसाईट नोट मिळाली

अमोलने आत्महत्या करण्यापूर्वी एक चिठ्ठी लिहून ठेवली आहे. त्यामध्ये आई-वडिलांना सांगितले की, मीच जबाबदारी आहे, मीच गुन्हेगार आहे, मला माफ करा, असे लिहून ठेवले आहे. त्यामुळे कौटुंबीक कलहातून ही घटना घडल्याचे दिसून येत आहे.

# महसूल पथकाला टीप्परखाली चिरडण्याचा प्रयत्न

**दुचाकीचा केला चेंदामेंदा; थोडक्यात बचावले तलाठी**

**दुचाकीवरुन उड्या मारून अधिकाऱ्यांनी वाचवला जीव**



**महासागर प्रतिनिधी**
**परतवाडा, (दि.23) -** जिल्ह्याचे पालकमंत्री आणि महसूल मंत्री जिल्ह्यात असतानाच वाळू तस्करांनी महसूल अधिकारूयांच्या पथकावर टिप्पर चढवण्याचा प्रकार घडवून आणला. ही प्रशासनासाठी आव्हानात्मक ठरत आहे.

शुक्रवारी (ता. 21) रात्री, अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या तस्करांनी महसूल पथकाला चिरडण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे तलाठ्याची नवीकोरी दुचाकी चेंदामेंदा झाली. महसूल अधिकारी आणि तलाठ्यांनी वेळीच उड्या मारून स्वत:चा जीव वाचवला. हा धक्कादायक प्रकार चांदूरबाजार पोलिस ठाणे हद्दीत घडला आहे.

गेल्या काही दिवसांत अचलपूर व चांदूरबाजार तालुक्यात मोठ्याप्रमाणावर अवैध वाळू उत्खनन आणि वाहतूक सुरू आहे. महसूल मंत्री वाळूमाफियांवर कारवाई करण्याच्या इराद्याने कडक धोरण जाहीर करणार असल्याचे सांगत असतानाच वाळू तस्करांनी महसूल अधिकारूयांवर हल्ला केल्याने खळबळ उडाली आहे. 21 फेब्रुवारी रोजी रात्री 10 ते 11 वाजताच्या सुमारास, महसूल पथक अब्दालपूर शिवारातील ई-क्लास येथे कारवाईसाठी गेले होते. यामध्ये ग्राम महसूल अधिकारी तलाठी विश्वजितसिंग बंगरे, मंडळ अधिकारी राजेश रावसाहेब व्यवहारे, अनिल पोटे, संतकुमार चव्हाण, राहूल जोशी, संजय चौधरी, निवृत्ती घुलक्षे, प्रफुल्ल पाटील, प्रफुल्ल डवरे आणि मनिष खलोकार या अधिकारूयांचा समावेश होता.

# शेतमजूर महिलेची विष प्राशन करून आत्महत्या



**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी, (दि.23) -** तालुक्यातील उतखेड येथील शशिकला श्रीकृष्ण वानखडे या 45 वर्षीय शेतमजुरी करणारूया महिलेने 14 फेब्रुवारी शुक्रवारला विष प्राशन केले. पुढील उपचारासाठी तिला अमरावतीच्या जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तिचा दि.21 फेब्रुवारी शुक्रवारला रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. जिल्हा सामान्य रुग्णालयातून आज तिचा मृतदेह उतखेड येथे आणण्यात आला. मृतक महिलेच्या पतीच्या नावाने दीड एकर शेती असून बॅक ऑफ महाराष्ट खानापूर आणि भारत फायनान्स चे कर्जाचे हत्ते कुटुंबावर थकीत आहेत. आपल्या कुटुंबावर असलेल्या कर्जाच्या डोंगरामुळे सदर महिलेने आत्महत्या केल्याचे बोलल्या जात आहेत.

# प्रकृती परीक्षणात पोटे आयुर्वेद महाविद्यालय देशात चौथे

## मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि.23) -** भारत सरकारच्या आयुष मंत्रालयातर्फे नोव्हेंबर-डिसेंबर 2024 या कालावधीत देश का प्रकृती परीक्षण अभियान संपूर्ण भारत देशात राबविण्यात आले. या अभियानात अमरावतीच्या पी. आर. पोटे पाटील आयुर्वेद महाविद्यालयाने सहभाग घेतला होता. सूक्ष्म नियोजनाच्या आधारावर या परीक्षणात स्ट्राईक रेट नुसार महाविद्यालयाने भारतातून चतुर्थ क्रमांक पटकाविला आहे. आयुष्य मंत्रालयाच्या भारतीय चिकित्सा पद्धती राष्टीय आयोगातर्फे मुंबई येथे नुकताच या परीक्षण प्रक्रियेचा पुरस्कार वितरण समारंभ पार पडला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य शामसुंदर भुतडा व भार्गव टप्पे यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारला. महाविद्यालयातील 180 विद्यार्थी 16 शिक्षक तसेच 5 वैद्यकीय अधिकारी यांनी प्रत्यक्ष प्रकृती परीक्षण करून व सर्व शिक्षकेतर व पॅरामेडिकल कर्मचारूयांनी नियोजनात सहकार्य करून 25 डिसेंबर 2024 पर्यंत 75 हजार प्रकृती परीक्षण करण्याचा विक्रम नोंदविला. महाविद्यालयातील द्वितीय वर्षाची विद्यार्थीनी ज्योती ढेपे हिने तब्बल 1500 प्रकृतीचे परीक्षण केले. त्यासाठी संस्थेचे अध्यक्ष प्रवीण पोटे पाटील, उपाध्यक्ष श्रेयस पोटे पाटील, प्राचार्य शामसुंदर भुतडा यांचे मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले. कार्यक्रमाचे संयोजक डॉ. भार्गव टप्पे, शैक्षणिक अधिष्ठाता रंजीत देशमुख व सर्व शिक्षकांनी सूक्ष्म नियोजन करून या यशासाठी उल्लेखनीय योगदान दिले. महाविद्यालयातर्फे आजही हे अभियान राबविले जात असून जिल्ह्यातील शिराळा वडगाव या आरोग्य केंद्रामार्फत प्रकृती परीक्षण करण्यात येत आहे. या कार्यक्रमाची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद घेऊन तीन विक्रम स्थापित करण्यात आले. यात पोटे महाविद्यालयाचाही सहभाग आहे.

# रिद्धपूर अत्याचार प्रकरणाची जिजाऊ ब्रिगेडकडून दखल



**महासागर प्रतिनिधी**
**परतवाडा, (दि.23) -** श्री क्षेत्र रिद्धपूर येथील एका मठात 17 वर्षीय अल्पवयीन युवतीवर सतत एक वर्ष जबरदस्तीने मठाचा प्रमुख आणि त्याच्या शिष्याकडून लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची घअना उघडकीस आली आहे. त्यातून या युवतीला गर्भधारणाही झाली आहे. या अमानवीय घटनेची जिजाउ ब्रिगेडने गंभीर दखल घेतली आहे. घटनेची चौकशी करण्यासाठी अमरावती जिल्हा जिजाऊ ब्रिगेच्या पदाधिकार्यांनी मठाला भेट दिली.सतरा वर्ष वय असलेल्या एका अल्पवयीन मुलीवर मठातील मठाधीपती सुरेंद्रमुनी तळेगावकर, मुलीचा मामा व देसाई नामक एक युवक वारंवार अत्याचार करत होते. त्यातून त्या मुलीला गर्भधारणा झाली. याप्रकरणातील आरोपींना अटकही झाली. परंतू हे प्रकरण दिसते तेवढे साधे नाही. या मागे खूप मोठे रॅकेट आहे असा आरोप जिजाउ ब्रिगेडने केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी यासाठी जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्षा सीमा बोके व पदाधिकार्यांनी स्वत: रिद्धपूर येथील मठाला भेट दिली. तिथे मुलीची आई, इतर काही महिला व पुरुषांसोबत त्यांनी सविस्तर चर्चा केली. मठातील प्रत्येक खोलीचे निरीक्षण केले. तळघरातही पाहणी केली. मठातील अनेक बाबी संशयास्पद आढळून आल्याचे पदाधिकार्यांचे म्हणणे आहे. या पदाधिकार्यांनी शिरखेडला जाऊन उपविभागीय पोलिस अधिकारी खांडेकर यांची भेट घेउन याप्रकरणाबाबत त्यांच्याशी चर्चा केली. भक्ती आणि श्रद्धेच्या नावाखाली महिलांचे शोषण करणारे असे अनेक मठ आहेत. यानंतर अशा संशयास्पद मठातील प्रकरणे जिजाऊ ब्रिगेड उजेडात आणेल असे सीमा बोके यांनी सांगितले. या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी अशा आशयाचे निवेदन पोलीस स्टेशन शिरखेड येथे देण्यात आले. यावेळी जिजाऊ ब्रिगेडच्या उपाध्यक्ष डॉ. अश्विनी देवके, संघटक प्रा. मनाली तायडे, अमरावतीच्या जिल्हाध्यक्ष हर्षा ढोक व डॉ. अंजली जवंजाळ, विभागीय कार्याध्यक्षा मीना कोल्हे, जिल्हा सचिव अनिता सदाफळे, सारिका मानकर, सुशिला कडू, किरण ठाकरे, भारती राऊत, रुपाली कळसकर, वैशाली चोरे, सुरेखा धर्माळे, प्रेमकुमार बोके, तुषार देशमुख, बाळासाहेब गोंडचवर आदी उपस्थित होते.

### हेमंत लबडे यांचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू



**महासागर प्रतिनिधी**
**दर्यापूर, (दि.23) -** दर्यापूरातील उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालयातील कर्तव्यदक्ष मुख्यालय सहाय्यक हेमंत लबडे (वय - 42) यांचे दि. 23 फेब्रुवारी सकाळच्या सुमारास हृदयविकाराच्या झटक्याने उपचारादरम्यान दु:खद निधन झाले. हेमंत लबडे अचानक निघून गेल्याने त्यांचा कार्यालयीन गोतावडा, मित्र परिवारामध्ये शोककळा पसरली आहे. त्यांच्यावर अमरावती येथील हिंदू स्मशानभूमीमध्ये त्यांच्यावर अंतिमसंस्कार करण्यात आले.

# विद्यार्थ्यांनी पारंगत होऊन समाजाच्या विकासासाठी कार्यरत रहावे!

**▸ राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन**
**▸ दीक्षांत समारंभ उत्साहात साजरा**
**▸ मुलींच्या वसतीगृहाचे भूमिपूजन**






**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि.23) -** पदवी पूर्ण होणे ही विद्यार्थ्याच्या आयुष्याची सुरुवात आहे. पुढील आयुष्यात विद्यार्थ्यांनी जगभरातील ज्ञानशाखांमध्ये पारंगत होऊन संपादन करावे. ज्ञानाचा उपयोग समाजाच्या हितासाठी करावा, तसेच राष्ट्र निर्माणासाठी अविरत कार्यरत रहावे, असे आवाहन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा 41वा दीक्षांत समारंभ विद्यापीठ परिसरात पार पडला. यावेळी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई, राज्यपालांचे सचिव प्रशांत नारनवरे, कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते आदी उपस्थित होते. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी, विद्यापीठ स्थापनेपासून विद्यार्थ्यांना परवडणारे उच्च शिक्षण देत आहे. दर्जेदार शिक्षण देऊन विद्यापीठाने नागरिकांचे जीवनमान बदलण्यात आणि संपूर्ण प्रदेशाची सामाजिक-आर्थिक स्थिती सुधारण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. आता विद्यापीठाने पारंपारिक अभ्यासक्रमांसोबत कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग, डेटा सायन्स, सायबर सुरक्षा आणि रोबोटिक्स या प्रगत क्षेत्राचे शिक्षण देण्यासाठी पुढाकार घ्यावा. विद्यार्थ्यांनी शिक्षणातील गुणवत्तेसोबतच खेळामध्येही प्राविण्य मिळवावे. आजच्या घडीला खेळाडू सर्वाधिक मानधन घेत आहेत. त्यामुळे खेळाडूंना पायाभूत सुविधा आणि प्रशिक्षणासाठी पाठिंबा देऊन उत्कृष्ट खेळाडू घडवावेत. केंद्र शासनाने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत जनाबाई, संत गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी मराठी भाषेतून विपूल लेखन आणि उपदेश केले आहे. मातृभाषा ही प्रत्येकाच्या हृदयस्थानी असते. त्यामुळे भाषेला अभिजात दर्जा मिळणे गौरवास्पद आहे. विद्यार्थ्यांनीही जगातील विविध भाषा शिकून प्रगती करावी. भाषेसोबतच विविध बोलींचा अभ्यास आणि तिचे जतन करावे. त्यासोबतच इतर भाषांमधील ज्ञान मराठीत भाषांतरित केल्यास त्याचा सामान्यांना फायदा होईल. भाषेसोबतच विद्यापीठाने उद्योगांच्या गरजा पूर्ण करतील असे अभ्यासक्रम तयार करावेत. स्टार्टअप इकोसिस्टम आणि इनक्युबेशन केंद्रांमुळे स्थानिक उद्योगांना पुरक वातावरण तयार होईल. उद्योगांची गरज पूर्ण करण्यासाठी विद्यापीठाने संशोधन आणि विकासासाठी सहकार्य करावे.

रोजगारक्षम मनुष्यबळ तयार करताना काम आणि जीवनाप्रती सकारात्मक दृष्टीकोनही येणे गरजेचे आहे. या सर्व प्रयत्नांतून प्रधानमंत्र्यांचे 2047 मधील विकसित राष्ट्राचे स्वप्न साकार होईल. असेही ते म्हणाले. यावेळी राज्यपाल यांच्या हस्ते मुलींच्या वसतीगृह आणि विस्तारीत इमारतीचे आभासी पद्धतीने भूमिपूजन करण्यात आले. कुलगुरू डॉ. बारहाते यांनी स्वागतपर भाषण केले. तसेच अहवालाचे वाचन केले. सुरवातीला राज्यपाल यांना राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने मानवंदना देण्यात आली. दीक्षांत समारंभात शितल पांडव, निकिता देवचे, अनिकेत पांडे, राधा चमेडिया, हर्षाली हटवार, उत्कर्षा वानरे, धनश्री सरकळे, लक्ष्मी चौधरी, प्राची बोरगावकर, शेख इक्रा अदीबा मोहमंद मुश्ताक यांचा सत्कार करण्यात आला.

### शिक्षण हे सर्वात मोठे शस्त्र-न्या.गवई

न्यायमुर्ती गवई म्हणाले, जिल्ह्याला संतांची महान परंपरा लाभली आहे. त्यांनी समाजाचे प्रबोधन करून मत परिवर्तन केले. त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन, स्वच्छता आणि शिक्षणाचे महत्व पटवून सांगितले. आजच्या काळात शिक्षण हे सर्वात मोठे शस्त्र आहे. विद्यार्थ्यांनी इच्छाशक्ती बाळगून शिक्षणातून प्रगती करावी, तसेच शिक्षणाचा उपयोग समाजहितासाठी करावा. आत्मसात केलेल्या शिक्षणाच्या माध्यमातून नवा भारत घडविण्याची क्षमता नव्या पिढीवर आहे. सक्षम विद्यार्थी घडविण्याची जबाबदारी विद्यापिठाने ओळखून कार्य करावे. सर्वदूर आणि सर्वस्तरातील घटकांना शिक्षण मिळावे, यासाठी विद्यापीठाने कार्य करावे. प्रामुख्याने ग्रामीण विकास मोहिम राबवून ग्रामीण जनतेचे जीवनमान उंचावण्यास मदत करावी. विद्यार्थ्यांनीही समाजाच्या विकासासाठी अविरत संघर्ष करून अभावग्रस्तांना मदत करावी, असे आवाहन केले.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# दिल्लीची नवीन कप्तान...

## राष्ट्रनामा



सुकृत खांडेकर
०९५९४२२४०००
sukritforyou@gmail.com

तब्बल २७ वर्षांनी दिल्लीत भाजपाची सत्ता स्थापन झाली. विधानसभा निवडणुकीत मतदारांनी दिल्ली विधानसभेच्या ७० पैकी ४८ जागांवर भाजपाचे आमदार निवडून दिले. भाजपाला सरकार स्थापनेचा स्पष्ट जनादेश मिळाला आणि अरविंद केजरीवाल यांना व त्यांच्या आम आदमी पक्षाला मतदारांनी नाकारले. काँग्रेसला सलग तिसऱ्या निवडणुकीत विधानसभेत खातेही उघडता आले नाही. केजरीवाल यांच्या पराभवाने आपच नव्हे तर विरोधी पक्षालाही मोठा झटका बसला. रेखा गुप्ता यांची मुख्यमंत्री म्हणून निवड झाल्याचे जाहीर होताच एक महिला दिल्लीची मुख्यमंत्री झाली याचा जसा सर्वांना आनंद झाला तसाच प्रथमच आमदार झालेल्या रेखा यांची पक्ष श्रेष्ठींनी दिल्ली राज्याच्या सर्वोच्च पदासाठी निवड केली म्हणून अनेकांना आश्चर्याचा धक्काही बसला. नवी दिल्ली मतदारसंघात अरविंद केजरीवाल यांचा ४ हजार मतांनी पराभव करणारे प्रवेश वर्मा यांना देशभर जायंट किलर म्हणून प्रसिद्धी मिळाली. त्यांचे वडील साहबसिंग वर्मा हेही भाजपाचे दिल्लीचे मुख्यमंत्री होते. त्यामुळे त्यांनाच मुख्यमंत्रीपदासाठी संधी मिळेल असे अनेकांनी गृहीत धरले होते. भाजपाचे अर्धा डझन नेते मुख्यमंत्रीपदासाठी इच्छुक होते पण मोदी-शहांनी रेखा गुप्ता यांना झुकते माप दिले.

सन २०१४ पासून मोदी-शहांच्या नेतृत्वाखाली भाजपाचा अश्वमेध देशभर दौडत आहे. देशात २१ राज्यांत भाजपा सत्तेवर आहे. केंद्रातही भाजपाने सरकार स्थापनेची व मोदींनी पंतप्रधानपदाची हॅटट्रीक संपादन केली आहे. राज्यात सत्ता मिळाल्यावर भाजपाने अनेक नवे चेहरे मुख्यमंत्रीपदावर बसवले. अनेक नेत्यांची मक्तेदारी संपुष्टात आणली. मध्य प्रदेशात मोहन यादव, राजस्थानात भजनलाल शर्मा, हरयाणात सुरुवातीला मनहरलाल खट्टर व नंतर नायबसिंग सैनी, ओडिसामधे मोहन माझी, छत्तीसगडमध्ये विष्णुदेव साय आणि आता दिल्लीत रेखा गुप्ता यांच्यावर मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी सोपवून नवे चेहरे सत्तेच्या सर्वोच्च पदावर आणले. सन २०१७ मध्ये उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्रीपदावर योगी आदित्यनाथ व सन २०२१ मध्ये गुजरातच्या मुख्यमंत्रीपदावर भूपेंद्र पटेल यांची निवड झाल्यावरही अनेकांना आश्चर्य वाटले होते. मोदी-शहा यांचे भक्कम पाठबळ त्यांच्या पाठीशी असल्याने पक्षाचे कार्यकर्ते मुख्यमंत्रीपदावर विश्वासाने काम करीत राहिले.

रेखा गुप्ता या भाजपाच्या व एनडीएच्या एकमेव महिला मुख्यमंत्री आहेत. देशात सध्या दोनच राज्यांत महिला मुख्यमंत्री आहेत. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी आणि आता दिल्लीत रेखा गुप्ता.

चौधरी चरणसिंग विद्यापीठाच्या दौलतराम कॉलेजमध्ये विद्यार्थी असताना १९९२ मध्ये रेखा गुप्ता यांनी अखिल विद्यार्थी परिषदेत कार्यकर्ता म्हणून प्रवेश केला. १९९५ मध्ये त्या संघटनेच्या सरचिटणीस झाल्या. १९९६ मध्ये संघटनेत अध्यक्ष म्हणून त्यांनी जबाबदारी स्वीकारली आणि नंतर राजधानी दिल्लीत भाजपाच्या कार्यकर्त्या, पदाधिकारी व लोकप्रतिनिधी म्हणून त्या राजकारणात सक्रिय झाल्या. दिल्लीच्या सार्वजनिक जीवनात तब्बल तीन वेळा नगरसेवक म्हणून त्या महानगर परिषेदवर निवडून आल्या. अडीच दशकांच्या काळात दिल्ली प्रदेश भाजपामध्ये विविध पदांवर काम करताना त्यांनी आपला ठसाही उमटवला. निवडणुकीच्या राजकारणात त्यांनी पराभवही पचवले. दिल्लीच्या नवव्या मुख्यमंत्री म्हणून त्यांनी शपथ घेतली. विद्यार्थी नेता ते मुख्यमंत्री असा त्यांचा प्रवास थक्क करणारा आहेच पण त्यांच्यातील निष्ठावान व प्रामाणिक कार्यकर्ता सदैव सज्ज आहे.

रेखा गुप्ता यांचा जन्म हरियाणातील जिंदमध्ये १९७४ मध्ये झाला. त्यांचे वडील जय भगवान जिंदाल यांची दिल्लीला स्टेट बँक ऑफ इंडियाच्या पितमपुरा शाखेचे ब्रँच मॅनेजर म्हणून बदली झाली तेव्हापासून त्यांचा परिवार दिल्लीला राहायला आला. याच पितमपुरा मतदारसंघातून रेखा गुप्ता पुढे भाजपाच्या नगरसेवक झाल्या व त्यांनी दिल्ली




विधानसभेची निवडणूकही लढवली. आपच्या उमेदवारासमोर त्या दोन वेळा पराभूतही झाल्या. पण यंदा चांगल्या मतांनी निवडून आल्या.

रेखा गुप्ता यांची दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदावर निवड करून भाजपाने आपण कार्यकर्त्यांना महत्त्व देतो व त्यांच्या पाठीशी उभे राहतो असा संदेश दिला आहे. भाजपाने सदैव संघटना मजबूत करण्यावर भर दिला आहे. प्रत्येक निवडणूक जिंकण्यासाठी लढवायची व प्रत्येक निवडणुकीत मतांची टक्केवारी वाढवायची हे भाजपाचे सूत्र असते. शीला दीक्षित यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस दिल्लीत सलग १५ वर्षे सत्तेवर होती. केजरीवाल यांचा पक्ष ११ वर्षे दिल्लीत सत्तेवर होता. पण त्यांनी सत्तेवर येऊनही संघटना बांधणीकडे पुरेसे लक्ष दिले नाही. रेखा गुप्ता यांच्या मुख्यमंत्रीपदाचा शपथविधी सोहळा दिल्लीच्या ऐतिहासिक रामलीला मैदानावर दिमाखात पार पडला. एनडीएचे देशभरातील सारे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री तसेच मोदी-शहा व केंद्रीय मंत्री या सोहळ्याला हजर होते. याच रामलीला मैदानावर काही वर्षांपूर्वी डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली केंद्रात यूपीएचे सरकार असताना अण्णा हजारे यांनी लोकपाल नियुक्तीसाठी आंदोलन केले होते. अण्णा हजारे यांच्या आंदोलनातूनच अरविंद केजरीवाल यांचे नेतृत्व आले. याच आंदोलनाचा राजकीय लाभ उठवून केजरीवाल यांनी आम आदमी पक्षाची स्थापना केली. अण्णा हजारे यांचा विरोध झुगारून त्यांनी राजकारणात प्रवेश केला व विधानसभा निवडणूक लढवून दिल्लीची सत्ता काबीज केली. एक तपापूर्वी ज्या जनतेने केजरीवाल व त्यांच्या पक्षाला पाठिंबा दिला होता, तीच जनता विशेषत: मध्यमवर्गीय मतदार आज भाजपाच्या पाठीशी मोठ्या विश्वासाने उभा आहे. याच जनतेने दिल्लीतील सर्व सात जागांवर गेल्या तीनही निवडणुकीत भाजपाचे सर्व खासदार लोकसभेवर निवडून दिले, याच जनतेने आता भाजपाला दिल्ली राज्याची सत्ता दिली आहे. म्हणूनच भाजपाने नव्या सरकारचा शपथविधी रामलीला मैदानावर मोठ्या थाटात साजरा केला.

गेले दशकभर दिल्लीने आपचा मुख्यमंत्री व उपराज्यपाल यांच्यातील संघर्ष पाहिला. मुख्यमंत्री म्हणून आपल्याला काम करू देत नाहीत म्हणून केजरीवाल सदैव केंद्र सरकारवर कसे खापर फोडत होते हे अनुभवले. आता केंद्रात भाजपा व राज्यात भाजपा असे डबल इंजिन सरकार दिल्लीला मिळाले आहे. त्यामुळे दिल्लीत केंद्र-राज्य असा संघर्ष होणार नाही, मुख्यमंत्री विरुद्ध उपराज्यपाल असा वाद दिसणार नाही. केंद्राचा निषेध करण्यासाठी आता दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांवर रस्त्यावर उपोषण करण्याची वेळ येणार नाही.

दिल्लीत रेखा गुप्ता यांच्या नेतृत्वाखाली भाजपाचे सरकार स्थापन झाले आहे पण या सरकारपुढे निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करणे हे फार मोठे आव्हान आहे. दिल्लीत सरकार आल्यावर भाजपा येथील महिलांना (लाडकी बहीण धर्तीवर) दरमहा २५०० रुपये देईल असे आश्वासन पक्षाने दिले होते. हे आश्वासन निश्चित पाळले जाईल ही मोदींची गॅरेंटी आहे, असे स्वत: पंतप्रधानांनी म्हटले होते. एवढेच नव्हे, तर दि. ८ मार्च, आंतरराष्ट्रीय महिला दिनापासून त्याची अंमलजावणी होईल, असेही त्यांनी सांगितले होते. विधानसभा निवडणुकीत भाजपाला पुरुषांपेक्षा जास्त म्हणजेच ६०.९२ टक्के महिलांनी मतदान केले हे लक्षात ठेऊन महिलांना दरमहा २५०० रुपये देण्याचे आश्वासन भाजपाला पाळावे लागेल. शिवाय गर्भवती महिलांना पोषण संच व २१ हजार रुपये देण्याचे आश्वासन भाजपाने निवडणूक जाहीरनाम्यात दिले आहे. महिलांना मोफत बस प्रवास चालूच राहणार आहे.

दि. ८ फेब्रुवारीला निवडणूक निकालानंतर भाजपाच्या मुख्यालयात पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या उपस्थितीत विजयोत्सव साजरा करण्यात आला तेव्हा, जय यमुना अशा घोषणा दिल्या गेल्या. रेखा गुप्तांनी शपथविधिनंतर मंत्रिमंडळासह यमुना नदीच्या घाटावर जाऊन आरती केली. स्वच्छ व प्रदूषणमुक्त यमुना करण्याचे आश्वासन भाजपाने दिले आहे. सन २०१५ मध्ये आपने स्वच्छ यमुना बनविण्याचे आश्वासन दिले होते, पण यमुना कधी स्वच्छ झालीच नाही. कचरा, घाणपाणी, नदी किनाऱ्यावरील अनधिकृत उद्योग व अनधिकृत वसाहतींचे पाणी या नदीत अखंड पडत असते. काँग्रेस किंवा आप यांना सत्तेवर असताना जमले नाही, ते यमुना नदी स्वच्छ व प्रदूषणमुक्त करणे हे भाजपापुढे मोठे आव्हान आहे.

आप सत्तेवर असताना मोफत वीज व पाणी सवलतीमुळे दहा हजार कोटींचा बोजा दिल्लीच्या सरकारी खजिन्यावर पडत असतो. या सवलती चालूच ठेवण्यात येतील, असे भाजपाने आश्वासन दिले आहे. दिल्लीची हवा वारंवार प्रदूषित होते, वर्षानुवर्षे हेच चालू आहे. राजधानीतील रस्ते खराब आहेत. ८० लाखांपेक्षा जास्त वाहनांनी या महानगरात वाहतुकीची कोंडी केली आहे. महिलांची सुरक्षा हा मोठा चिंतेचा विषय आहे. रोजगारासाठी रोज परप्रांतीयांचे लोंढे दिल्लीवर वर्षानुवर्षे आदळत आहेत. रोज येणाऱ्या हजारो लोकांची पार्श्वभूमी काय याची कोणतीही माहिती पोलीस-प्रशासनाला नसते. बेरोजगारी ही दिल्लीची मोठी समस्या आहे. सरकारी शाळा व सरकारी इस्पितळांतील सेवेची गुणवत्ता वाढवणे हे मोठे आव्हान आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर खासगी क्षेत्राने मोठा कब्जा केला आहे. या समस्या सोडवताना भाजपा सरकारच्या कप्तान म्हणून रेखा गुप्ता यांना काही कठोर निर्णय घेणेही आवश्यक आहे.

# महाराष्ट्रातही ‘लव्ह जिहाद’विरोधी कायदा होणार!

यंदा विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात महायुतीने हिंदुत्वाच्या मुद्याला प्राधान्य दिले, ज्यामुळे हिंदूंनी मोठ्या संख्येने घराबाहेर पडून महायुतीला भरभरून मतदान केले परिणामी राज्यात पुन्हा एकदा हिंदुत्ववादी विचारांचे सरकार आले. अन्य राज्यांप्रमाणे महाराष्ट्रतही लव्ह जिहादविरोधी कायदा करण्यात यावा ही मागणी गेल्या अनेक वर्षांपासून हिंदुत्ववादी संघटना, संप्रदाय आणि मंडळांकडून करण्यात येत आहे. नवनिर्वाचित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत सर्वांना आश्वस्त केले असून राज्यात लवकरच लव्ह जिहाद आणि फसवणूक, बळाचा वापर करून केलेले धर्मांतरण रोखण्यासाठी कायदा करण्यात येणार असल्याचे सूतोवाच केले. त्यासाठी राज्य सरकारने पोलीस महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष समिती गठीत केली आहे. ही समिती राज्यातील सध्याच्या परिस्थितीचा अभ्यास करून लव्ह जिहाद फसवणूक आणि बळाचा वापर करून केलेले धर्मांतरण यावर उपाययोजना सुचवून कायद्याचा मसूदा तयार करणार आहे. याआधी उत्तर प्रदेश, हरियाणा, हिमाचल प्रदेश, गुजरात, झारखंड, मध्यप्रदेश, उत्तराखंड, ओडिसा आणि छत्तीसगड या नऊ राज्यांनी लव्ह जिहादविरोधी कायदा अमलात आणला असून राज्यात हा कायदा लागू झाल्यास लव्ह जिहादच्या विरोधात कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील दहावे राज्य ठरणार आहे.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई
मो.क्र. ९६६४५५९७८०

२७ जुलैच्या पहाटे उरण कोर्टनाका पेट्रोल पंपाजवळ यशश्री शिंदे नावाच्या २२ वर्षीय मराठी तरुणीचा तिचे हात, अवयव कापून, चेहरा आणि गुप्तांगावर जखमा केलेल्या अवस्थेत मृतदेह सापडला. पोलिसांनी या प्रकरणी अधिक तपास केला असता ही हत्या प्रेमप्रकरणातून झाली असल्याचे उघड झाले होते. यशश्री हिच्या मुस्लिम प्रियकरानेच तिची हत्या केल्याचे उघड झाले. राज्यातील मराठमोळी मुलगी श्रद्धा वालकरची अशाच प्रकारे लव्ह जिहादमध्ये हत्या झाली होती. या घटनेनंतर मानसिक धक्का बसलेल्या तिच्या वडिलांचे नुकतेच निधन झाले. यानंतरही राज्यात लव्ह जिहादची प्रकरणे एकामागोमाग समोर येत आहेत. हिंदू तरूणींना प्रेमाच्या जाळ्यात ओढायचे, त्यांच्याशी शारीरिक संबंध ठेवायचे त्या दरम्यान त्यांच्या व्हिडीओ क्लिप्स बनवायच्या, त्याआधारे त्यांना ब्लॅकमेल करायचे, त्यांच्याशी विवाह करायचा, मुले जन्माला घालायची आणि नंतर वाऱ्यावर सोडून द्यायचे किंवा त्यांना देहविक्रय करायला भाग पाडायचे नाहीतर अरब राष्ट्रांत विकायचे आणि पुन्हा दुसऱ्या हिंदु तरूणीला जाळ्यात ओढण्याची तयारी करायची अशा प्रकारचे षडयंत्र आज लव्ह जिहादच्या नावाने देशभर सुरु आहे. काही जिहादी तरूणांना ७-८ वर्षांपूर्वी जळगाव जिल्हयातून अटक केली असता त्यांनी अन्य धर्मीय मुलींना जाळ्यात ओढण्याकरिता कशा प्रकारे पैसा पुरवला जातो, हे षडयंत्र कसे काम करते, याचा पाढाच वाचला होता. आंतरराष्ट्रीय किर्तीची नेमबाज तारा सहदेव हिलाही लव्ह जिहादला सामोरे जावे लागले होते. आजमितीला केरळ आणि कर्नाटक राज्यात लव्ह जिहाद इतक्या मोठ्या प्रमाणात फोफावला आहे, की केरळ उच्च न्यायालयाने लव्ह जिहादची स्वतंत्र चौकशी करण्याचे आदेश दिले होते. केरळमधील लव्ह जिहादचे वास्तव स्पष्ट करणारा सत्य घटनेवर आधारित दि केरळा स्टोरी नावाचा चित्रपटही येऊन गेला. या चित्रपटाने लव्ह जिहादचे रॅकेट कशाप्रकारे काम करते हे समस्त भारतीयांसमोर उघड केले. याशिवाय लव्ह जिहादला बळी पडलेल्या मुलींच्या शेकडो मुलाखती आज यु ट्यूबवर उपलब्ध आहेत.

पोटच्या मुलीला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपावे, तिला शिकवावे, तिचे सर्व हट्ट पुरवावे आणि वयात आल्यावर तिच्यासाठी सुयोग्य वर शोधून तिचे कन्यादान करावे अशी प्रत्येक आई वडिलांची माफक इच्छा असते. अशी लाडाप्रेमाने वाढवलेली मुलगी कोणाच्या तरी फसव्या प्रलोभनांना फसते आणि आई वडिलांना झुगारून धर्मपरिवर्तन करते हे कोणत्याही आई वडिलांच्या काळजावर घाव करणारेच आहे. मुलीने स्वत:च्या मनाने निवडलेला जोडीदार तिला सुखाने नांदवणारा आहे हे कळल्यावर पालकांचा राग उणावतोही; मात्र आपली लाडकी मुलगी एका जिहादी संकटाला बळी पडली असून तिच्या आयुष्याची पुरती फरफट झाल्याचे ऐकून त्या आईबापाचे ह्रदय किती पिळवटून निघत असेल याचा विचार कोणी केला आहे का ? देशभरातील अशा लाखो मुली या षडयंत्राला बळी पडल्या आहेत. माध्यमांसमोर येऊन आपली व्यथा मांडण्याचे धाडस सर्वांमध्ये नसते. त्यापैकी काही निमूटपणे अन्याय सहन करतात, तर काही कुंटणखाना हेच आपले घर मानून प्रतिदिन मरणयातना सहन करतात. धर्मनिरपेक्ष राष्ट्रात प्रत्येकाला आपल्या धर्माप्रमाणे आचरण करण्याचा घटनादत्त अधिकार असून फूस लावून, प्रलोभने दाखवून किंवा बळाचा वापर करून धर्मांतरण करणे कायद्याने गुन्हा आहे. असे असतांना लव्ह जिहादच्या अंतर्गत हिंदू मुलींना फूस लावून किंवा त्यांच्यावर जबरदस्ती करून त्यांचे धर्मांतरण केले जात आहे. पहिल्या पत्नीची संमती असल्याविना दुसरी पत्नी करणे हा कायद्याने दखलपात्र गुन्हा असतांना हिंदू मुलींशी निकाह करून त्यांचा उपभोग घेऊन त्यांना वाऱ्यावर सोडून सर्रासपणे दुसरा निकाह केला जातो. राज्यात लव्ह जिहाद विरोधी कायदा आल्यावर गुन्हेगारांना कायद्याने शासन होईलच; मात्र अशा षड्यंत्राला आपल्या घरातील कोणतीही स्त्री बळी पडता कामा नये याची काळजी आपणच घ्यायला हवी. आज लव्ह जिहाद दारापर्यंत येऊन ठेपला आहे. उद्या तो आपल्या घरातही येऊ शकतो यासाठी प्रत्येक हिंदु मुलीने आणि तिच्या पालकाने सतर्क रहायला हवे. एखादी मुलगी लव्ह जिहादला बळी पडत आहे असे लक्षात येताच ती आपली भगिनी आहे या भावाने तिला लव्ह जिहादची भयावहता लक्षात आणून दिली पाहिजे. हिंदूंच्या वंशवृद्धीवर घाव घालू पहाणाऱ्या लव्ह जिहादरुपी संकटावर अंकुश आणण्यासाठी लव्ह जिहादविरोधी कायदा मोलाचे कार्य करणार आहे.

# व्हॉट्सअप वाढदिवस!

आजचे युग हे सोशल मिडियाचे युग आहे आणि या सोशल मीडियाच्या युगात प्रत्येकाच्या मोबाईल मध्ये अनेक मेसेजिंग प्लिकेशन आहेत आपणही दररोज अनेक मेसेजिंग प्लिकेशनचा वापर करतो. या मेसेजिंग प्लिकेशनमध्ये सर्वाधिक लोकप्रिय आणि सर्वाधिक वापरले जाणारे मेसेजिंग प्लिकेशन म्हणजे व्हाट्सअप. याच सर्वाधिक लोकप्रिय आणि वापरले जाणाऱ्या व्हॉट्सअप या मेसेजिंग प्लिकेशनचा आज वाढदिवस आहे. व्हॉट्सअप हा आज परवलीचा शब्द झाला आहे. आज प्रत्येकाच्या मोबाईलमध्ये दुसरे कोणते प्लिकेशन असो वा नसो पण व्हॉट्सअप हमखास बघायला मिळते. २४ फेब्रुवारी २००९ रोजी जेन कॉम याने व्हाट्सअप नावाची कंपनी स्थापन केली. व्हाटसअपचा निर्माता जेन कॉम याचा जन्म युक्रेन देशातील छोट्या गावात झाला. त्याचे वडील मजूर तर आई गृहिणी होती. युक्रेनमध्ये राजकीय अस्थिरता निर्माण झाल्यावर त्याचे वडील अमेरिकेत स्थलांतरित झाले. तिथे ते छोटीमोठी कामे करू लागले. जेन कॉम याला कॉम्प्युटर प्रोग्रामिंगची आवड होती. त्याच्या घराजवळच एक लायब्ररी होती. तेथून तो कॉम्प्युटर प्रोग्रामिंगचे पुस्तके आणत व घरच्या कॉम्प्युटरवर प्रोग्रामिंग करीत. पुढे त्याने कॉम्प्युटर सायन्समध्ये डिग्री मिळवून एका सॉफ्टवेअर कंपनीत सिक्युरिटी टेस्टर म्हणून काम सुरू केले. १९९७ साली याहू कंपनीने इन्फ्रास्ट्रक्चर इंजिनिअर या पदावर त्याची नेमणूक केली. या कंपनीत त्याने ९ वर्ष नोकरी केली. दुसऱ्या कंपनीत नोकरी करण्यापेक्षा स्वतःची कंपनी सुरू करावी या विचाराने त्याने याहूला राजीनामा दिला. याहूमध्ये ब्रायन अकटन हा त्याचा सहकारी होता. त्यानेही याहूला राजीनामा दिला. दोघांनी मिळून स्वतःची कंपनी स्थापन करण्याचे ठरवले. त्या सुमारास ऍप्पल कंपनीने आयफोन बाजारात आणला होता. त्यात मेसेज पाठवण्याची सुविधा होती. त्यावरून त्यांना व्हॉट्सअपची कल्पना सुचली. पुढे



दोघांनी त्यावर काम करण्यास सुरवात केली. या प्रयोगात त्यांना यश मिळाले का नाही हे विचारण्यासाठी त्यांच्या मित्राने त्यांना विचारले व्हॉट्सअप ! व्हॉट्सअप या शब्दाचा अर्थ होतो काय झाले ? हा शब्द कानावर पडता क्षणीच त्यांनी ठरवले आपल्या कंपनीचे नाव आपण व्हॉट्सअप हेच ठेवायचे. २४ फेब्रुवारी २००९ रोजी त्यांनी व्हॉट्सअप नावाची कंपनी स्थापन केली. सुरवातीला व्हॉट्सअपला खूपच कमी प्रतिसाद मिळाला कारण तेंव्हा अँड्रॉइड मोबाईलची संख्या खूप कमी होती पण जशी अँड्रॉइड मोबाईलची संख्या वाढत गेली तशी व्हॉट्सअप वापरणाऱ्यांची संख्याही वाढत गेली. आज व्हॉट्सअप जगातील पहिल्या क्रमांकाचे एप्लिकेशन बनले आहे. जगातील किमान दोनशे कोटीहून अधिक लोक व्हॉट्सअपचा वापर करतात. प्रत्येकाच्या मोबाईलमध्ये व्हॉट्सअप असतेच. व्हॉट्सअपवर रोज एक लाख कोटीहून अशिक मेसेज सेंड होतात. व्हॉट्सअप वरुन दररोज ५०० कोटीहून अधिक फोटो तसेच १०० कोटीहून अधिक व्हिडीओ शेअर होतात. सुरवातीला फक्त इंग्रजीमध्ये असणारे व्हॉट्सअप आज ५ भाषांमध्ये आहे. व्हॉट्सअप नेहमीच नवनवीन सुविधा वापरकर्त्यांसाठी उपलब्ध करुन देते. व्हिडिओ कॉल, ऑडियो कॉल, स्टेटस अशा नवनवीन सुविधा व्हॉट्सअप कडून वापरकर्त्यांना देण्यात आल्या आहेत. आज व्हॉट्सअप वरून पैसेही पाठवता येऊ शकतात. २०१४ साली फेसबूकच्या मार्क झुकेरबर्ग याने १९ बिलियन डॉलरला जेन कॉम आणि ब्रायन अकटन यांच्याकडून व्हॉट्सअप खरेदी केले. आज व्हॉट्सअपची मालकी मार्क झुकेरबर्ग यांच्याकडे आहे. आज व्हॉट्सअप प्रत्येकाच्या जीवनातील अविभाज्य घटक बनला आहे. आपली दिवसाची सुरुवात व्हॉट्सअपनेच होते. सकाळी झोपेतून उठल्यावर आपण जर पहिल्यांदा काय पाहत असतो तर ते व्हॉट्सअप !आपण झोपताना ही व्हॉट्सअप पाहूनच झोपतो. व्हॉट्सअप वर ग्रुपची सुविधा सुरू झाल्याने एकाच वेळी शेकडो लोकांना मेसेज पाठवण्याची सुविधा निर्माण झाली. व्हॉट्सअप वर आज कोयावधी ग्रुप आहे. केवळ मित्रांचे नातेवाईकांचे च नाही तर शासकीय नोकरांचे देखील ग्रुप आहे. शासकीय संदेश, आदेश देखील आता व्हॉट्सअप वर दिले जातात. लहान मुलांपासून थोरांपर्यंत सर्वांच्या जीवनाच्या अविभाज्य भाव बनलेल्या व्हॉट्सअपला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# बांगलादेशातील हिंदूंचे संकट : आंतरराष्ट्रीय आणि भारतीय जबाबदारी

प्रस्तावना : बांगलादेशातील हिंदूंवर होत असलेले अत्याचार ही एक जागतिक पातळीवरील समस्या बनली आहे. धार्मिक कट्टरतेच्या नावाखाली हिंदूंच्या हत्या, जबरदस्तीने धर्मांतर,संपत्ती लुटणे आणि त्यांच्या धार्मिक परंपरांवर हल्ले, यामुळे हिंदूंचे अस्तित्व धोक्यात आले आहे. ते कसे आणि त्यावर उपाय काय असू शकतो, भारताने काय करणे अपेक्षित आहे या विषयी माहिती या लेखात बघणार आहोत.

**बांगलादेश निर्मिती आणि धार्मिक तणावाचा इतिहास:**

१९७१ साली भारत पाकिस्तान युद्धाच्या पार्श्वभूमीवर बांगलादेशची निर्मिती झाली. ही घटना ऐतिहासिक सांस्कृतिक आणि राजकीय संघर्षातून साकारली गेली. पूर्व पाकिस्तानात (म्हणजे आजच्या बांगलादेशात) झालेले भाषा आंदोलन,आर्थिक संसाधनांची कमतरता, राजकीय असमतोल याचा परिणाम म्हणजे पूर्व पाकिस्तान आणि पश्चिम पाकिस्तान मध्ये झालेले युद्ध आणि त्यानंतर झालेली बांगलादेशची निर्मिती! तेथील हिंदूंना सुरवातीपासूनच सतत धार्मिक कट्टरतेला तोंड द्यावे लागले. युद्धानंतर तेथील हिंदूची संख्या सतत घटत राहिली. एकूण लोकसंख्येच्या केवळ ७-८% हिंदू शेष राहिले. तेव्हापासून आजपर्यंत हिंदूंना तेथे विविध अत्याचारांना सामोरे जावे लागत आहे.जसे की,

१. धार्मिक तणाव आणि अत्याचार : मंदिरे उद्धवस्त करणे, जबरदस्तीने धर्मांतर, महिलांवर अत्याचार, संपत्तीचा बळजबरीने ताबा घेणे.

२. राजकीय अनिश्चितता : राजकीय अस्थिरतेचा हिंदू समाजावर मोठा परिणाम होत आहे. त्यांना राजकीय दबाव आणि हिंसेचा सामना करावा लागतो.

३. जमीनीवर ताबा आणि मालमत्ता विवाद : बांगलादेशात वेस्टेड प्रॉपर्टी क्ट (पूर्वीचा एनिमी प्रॉपर्टी क्ट) लागू होता, ज्यामुळे हिंदूंना त्यांच्या जमिनी आणि संपत्तीवर हक्क गमवावा लागला.

जरी हा कायदा कालबाह्य झाला असला तरी, अद्याप अनेक हिंदू त्यांच्या जमिनींवर हक्क प्रस्थापित करू शकलेले नाहीत.

४. धार्मिक कट्टरता वाढणे : कट्टरपंथीय विचारसरणीचे लोक हिंदूंना सतत लक्ष्य करतात. यामुळे हिंदूंना त्यांच्या धार्मिक परंपरा साजऱ्या करताना अडथळे येतात.

**सध्याची स्थिती आणि हिंदूंवरील वाढते अत्याचार**

जून २०२४ पासून सरकारी धोरणामुळे (आरक्षण संदर्भातील) हिंसेचा उद्रेक झाला.

सांप्रदायिक हिंसा: हिंदूंवर क्रूर हल्ले झाले. हिंदूंच्या मंदिरांवर आणि घरांवर हल्ले करून लूट करण्यात आली.

धार्मिक आदेश (फतवा): दुर्गा पुजा उत्सवादरम्यान लाऊड स्पीकरच्या वापरावर निर्बंध घालण्यात आले.

धार्मिक कट्टरतावाद: इस्कॉन शी संबंधित असलेल्या हिंदू कुटुंबांवर अनन्वित अत्याचार होत आहेत. अशा कुटुंबातील मुलींना पळवून नेले जात आहे. कथित देशद्रोहाच्या आरोपाखाली इस्कॉनचे सदस्य चिन्मय कृष्णदास प्रभू यांना अटक करण्यात आली.

मुसलमानांची दहशत: मुसलमानांच्या दहशतीमुळे सुरुवातीला चिन्मय प्रभू यांचे वकीलपत्र घेण्यास कुणीही सिद्ध झाले नाही. त्यानंतर न्यायालयात प्रतिनिधित्व करणाऱ्या वकिलांनाही धमक्या देण्यात आल्या.

प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे त्यांना मूलभूत सुविधा, औषधे आणि अन्न सुद्धा नाकारले गेले. ज्या इस्कॉन ने बांगलादेश मुक्तीच्या वेळी प्रचंड प्रमाणात बांगलादेशी नागरिकांना खाऊ घातले होते, ते बांगलादेशी मुसलमान खाल्ल्या मिठाला जागले नाहीत.

**आंतरराष्ट्रीय समुदायाचे अपयश**

१. छोट्याहून छोट्या प्रकरणात मानवाधिकार म्हणून हस्तक्षेप करणारी मानवाधिकार संघटना जगभरात हिंदूंचा छळ होत असताना मूग गिळून गप्प आहे.

२. नोबेल पुरस्कार समिती आणि मुस्लिम नेत्यांनी या अत्याचारांवर मौन बाळगले आहे.

३. नोबल पुरस्कार विजेते मोहम्मद युनूस आणि बांगलादेशातील अंतरिम सरकारवर जगभरातून टीका होत आहे.

कुठल्याही देशाच्या सरकारचे पहिले उत्तरदायित्व हे धोका असलेल्यांना संरक्षण पुरवणे असते, बांगलादेशात ते होतांना दिसत नाही.

आंतरराष्ट्रीय धार्मिक स्वातंत्र्य विषयावरील युनायटेड स्टेट कमिशनचे माजी आयुक्त जॉनी मूर यांनी म्हटले, बांगलादेशात आता असा एकही अल्पसंख्यांक नाही, ज्याच्या जीविताला धोका नाही. जेथे चिन्मय कृष्ण दास प्रभु यांना अटक होऊ शकते, तर अन्य कुणालाही सहज अट होऊ शकते.

**भारताची भूमिका आणि प्रतिक्रिया**

भारताने बांगलादेशाला १९७१ मध्ये स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी मोठे योगदान दिले. परंतु,आज बांगलादेश हिंदूंच्या विरोधात कट्टरतेचे केंद्र बनले आहे..

१. डॉक्टरांचा निषेध: सिलिगुडीतील डॉक्टरांनी बांगलादेशी रुग्णांवर उपचार करण्यास नकार देत निषेध व्यक्त केला.

२. सरकारचे दुर्लक्ष: भारत सरकारने या प्रकरणांवर कठोर भूमिका न घेणे गंभीर प्रश्न निर्माण करते. आतापर्यंत भारताचे शेजाऱ्यांच्या संदर्भातील धोरण हे सहकार्याचे राहिले आहे. याचाच अपलाभ पाकिस्तान आणि बांगलादेश यांसारखे इस्लामी देश घेतांना दिसत आहेत. बांगलादेश व्यापार, उद्योग आदी बऱ्याच गोष्टींसाठी भारतावर अवलंबून आहे. मुळात बांगलादेशाच्या निर्मितीमध्ये भारताचा वाटा महत्त्वाचा आहे; मात्र तेथील उद्दाम शासनकर्ते हे उपकार विसरले आहेत. आम्ही भारत आणि हिंदू यांच्याशी कसेही वागलो, तरी भारत आम्हाला साहाय्य करणार, या भ्रमात ते वावरत आहेत.हा भ्रमाचा भोपळा फोडण्याची वेळ आली आहे.

**करावयाचे प्रयत्न**

१. भारताचे कठोर पावले उचलणे: बांगलादेशावर व्यापार निर्बंध लागू करणे आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर दबाव निर्माण करणे.

२. जागतिक समुदायाचा हस्तक्षेप: आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघटनांनी कठोर कारवाई करणे गरजेचे आहे.

३. हिंदूंसाठी संरक्षण उपाय: बांगलादेशातील हिंदूंचे संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी भारताने जागतिक मंचावर आवाज उठवणे आवश्यक आहे. बांगलादेशातील हिंदूंवर होणारे अत्याचार केवळ एका देशाची समस्या नाही तर जागतिक मानवी हक्कांचा प्रश्न आहे. भारताने यावर कठोर भूमिका घेतली तरच हिंदू समाजाचे संरक्षण आणि देशाची प्रतिष्ठा टिकवून ठेवता येईल.

सौ. प्रिया बागडदेव,
छिंदवाडा

# पात्रता (ग्रहणशीलता)



संत राजिन्दर सिंह जी महाराज

ग्रहणशीलता (योग्य पात्रता) प्राप्त करण्यासाठी एखाद्या रिकाम्या प्याल्या प्रमाणे रिकामा होणं होणे आवश्यक आहे. ही जीवन जगण्याची एक कला आहे. प्रभू आपणास जे देतील त्याच्या प्राप्तीसाठी आपण नेहमी तयार राहावे, असा पात्रतेचा अर्थ आहे. प्रार्थना करण्याची ही सर्वोत्तम अवस्था आहे. ज्यामध्ये आपण कोणत्याही वस्तूची मागणी करीत नाही, परंतु केवळ प्रेम आणि भक्तिभावाने आपल्याला प्रभू जे काही देऊ इच्छितात, ते खुशी खुशी ने स्वीकारतो. कारण की आपण हे जाणून आहोत कि, जे आपल्या भल्यासाठी आहे तेच परमात्मा देतील.

आपण अशी प्रार्थना तेव्हाच करू शकतो जेव्हा प्रभू वर आपली श्रद्धा आणि विश्वास दृढ असेल. प्रभू प्रति श्रद्धा आणि विश्वासाची वाढ होणं फार महत्त्वाचं आहे, हे अनुभवातूनच प्राप्त होतं.

बहुदा आपण प्रभू चा आशीर्वादाला त्याच रूपात प्राप्त करू इच्छितो, ज्यामध्ये आपल्या इच्छा पूर्ण होतील. जेव्हा प्रभू चा आशिर्वाद अशा स्वरूपात प्राप्त होत नाही, जे आपण स्वीकारू इच्छित नाही. कधी कधी आपण अशी काही गोष्ट मागतो, जी आपल्या भल्यासाठी नसते अथवा ती एवढी ही चांगली असत नाही जी प्रभू आपल्याला देऊ इच्छितात.

जेव्हा आपण प्रार्थना एखादी वस्तू प्राप्त होण्याकरीता करतो, तेव्हा आपली प्रार्थना त्वरित स्वीकारली जाते अथवा दुसऱ्या वेळेस बिलकुल स्वीकारली जाणार नाही, अशामुळे आपण उदास होण्याचा धोका बळावू शकतो. यामुळे आपली प्रभू वरील आस्था उडून जाते. परंतु आपण अशा बाबींसाठी प्रार्थना करीत नाही ज्या प्रभू आपल्याला देऊ इच्छित नाही, मग आपण निराश होण्याचा प्रश्नच येत नाही.

योग्यता प्राप्त करून प्रार्थना करण्यासाठी अध्यात्मिक विकास होण्याची फारच आवश्यकता आहे. आपणास आध्यात्मिक विकास करण्याकरिता एखाद्या अनुभवी महापुरूषा कडे गेले पाहिजे. त्यांच्या संपर्कात राहिल्याने, त्यांनी दिलेल्या शिकवणुकीनुसार जीवन जगल्याने, तसेच आत्मिक अनुभव प्राप्त करून, आपली श्रद्धा आणि विश्वास सुद्धा दृढ होतो. तेव्हा आपल्याला खात्री पटते की प्रभू आपले मित्र, हितचिंतक आणि रक्षक आहेत. तेव्हाच आपण प्रभू ला समर्पित होऊ शकतो.

तेरा भाणा मीठा लागे म्हणजेच ठेविले अनंते तैसेची रहावे अशी भावना ठेवणे ही पात्रतेची सर्वोच्च अवस्था आहे. ज्यामध्ये आपले मन शांत होते आणि आपला अहंकार नष्ट होतो. प्रभू द्वारे दिल्या गेलेल्या दैवी दानाचा जास्तीत जास्त लाभ घेण्याकरिता, एखाद्या रिकाम्या प्याल्या प्रमाणे विनम्रता धारण केली पाहिजे. जर आपण धीर ठेवला आणि त्याची वाट पहात राहिलो, तर आपण अधिक गोष्टी प्राप्त करू शकतो, जेवढे की आपल्या कल्पनेत सुद्धा नव्हते. जर आपण धीरोदात्त बनलो आणि शांत राहिलो, तर आपल्याला समजेल कि प्रभुंना सर्व माहित आहे कि आपल्यासाठी सर्वोत्तम काय आहे.

## अशोकायन...

### संत गाडगे बाबा

योजना राबवाव्या काटेकोर
जनतेनेही रहावे दक्ष
तेंव्हा स्वच्छता अभियानाचे
सफल होईल लक्ष ..
हातात घेतात खराटा
फोटो घेतात काढून
कशाला हवं तुम्हाला
पेपरात फोटो छापून ?
तुमच्या ह्या नवटंकीनच
योजनांचे वाजले कीबारा
गाडगेबाबांच्या जयंती
पर्वावर बदलाना विचारधारा .



प्रा. अशोक सारडा, मेहकर.
(९४२२३९४३३९)

# वरुडमध्ये कॉटनबी जिनिंग इंडस्ट्रिजची पायाभरणी



## शेतकऱ्यांच्या उद्योगाची मूहूर्तमेढ

महासागर प्रतिनिधी
वरुड,( दि.23 ) - शेतामालावर पक्रिया होवून त्याचा लाभ शेतकर्यांना मिळावा आणि शेतकरी उद्योजक बनावा या उद्देशाने जागतिक बँक पुरस्कृत स्व. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण प्रकल्पा (स्मार्ट) अंतर्गत कॉटनबी जिनिंग इंडस्ट्रिज प्रा. लि. या उद्योगाची वरुड तालुक्यातील शेकापूर येथे उभारणी होत आहे. त्याचा पायाभरणी समारंभ आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांच्या हस्ते पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री क्षेत्र रिद्धपुर येथील गुरुवर्य आम्नाय आचार्य श्री यक्षदेव बाबा शास्त्री हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून स्टेश बँकेचे शाखा व्यवस्थापक मनिष पाठक, माजी जि. प. सभापती गिरीश कराळे, माजी पं. स. सभापती विक्रम ठाकरे, कृषि उत्पन्न बाजार समिती सभापती नरेंद्र उर्फ बबलु पावडे, गोमती जिनिंग ऑन्ड प्रेसिंगचे संचालक रितेश शाह, माजी पं. स. सभापती निलेश मगर्दे, विभागीय अंमलबजावणी कक्ष (स्मार्ट) प्रकल्प अमरावतीचे नोडल अधिकारी डॉ. प्रशांत नाईक, जिल्हा अंमलबजावणी कक्ष (स्मार्ट) नोडल अधिकारी विवेक टेकाडे, माजी जि. प. अध्यक्ष ज्ञानेश्वर दाभाडे, तालुका खरेदी विक्री संघाचे माजी अध्यक्ष बाबाराव बहुरुपी, अमरावती येथील चार्टर्ड अकाऊंटंट दीपक झंवर, विभागीय अंमलबजावणी कक्षाचे अधिकारी मिलिंद वानखडे, पुरवठा व मूल्य साखळी तज्ञ निलेश राठोड, कंत्राटदार जयकिशन बाहेती आदी मान्यवर उपस्थित होते. 4 कोटी 13 लाख रुपये खर्च करुन कॉटनबी जिनिंग इंडस्ट्रिज प्रा.लि.चा उद्योग याठिकाणी निर्माण होत आहे. उद्योगासाठी महत्वाची भुमिका बजावणारे आणि कंपनीला जागा उपलब्ध करुन देणारे अशोक निकम व जिजा निकम, एसबीआय वरुडचे व्यवस्थापक मनिष पाठक, गोमती जिनिंग ॲणन्ड प्रेसिंगचे संचालक रितेश शाह, माजी पं.स.सभापती निलेश मगर्दे, विभागीय अंमलबजावणी कक्ष (स्मार्ट) प्रकल्प अमरावतीचे नोडल अधिकारी डॉ. प्रशांत नाईक यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन प्रा. अमरदीप खाडे, प्रास्तविक कॉटनबी ॲवग्रो प्रोड्युसर कंपनीचे अध्यक्ष प्रदीप बहुरुपी तर उपस्थितांचे आभार संचालक चंद्रकांत भड यांनी मानले. या कार्यक्रमाला कॉटनबी ॲग्रो प्रोड्युसर कंपनीचे सर्व सभासद, परिसरातील शेतकरी, कापुस उत्पादक, व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कंपनीचे संचालक प्रदीप बहुरूपी, चंद्रकांत भड, अशोक निकम, अरुण ढोले, वंदना टिपरे, विजय भड, कविता बहुरुपी, मंजुश्री भड, प्राची निकम, पंचफुला बहुरूपी, मिलिंद निकम, सागर भोंडे, तुषार बहुरुपी, वंदना भड, वर्षा भड आदींनी परिश्रम घेतले.

# वणीतील चोर शेंदुरजना घाटमध्ये जेरबंद

महासागर प्रतिनिधी
अमरावती,( दि.23 )- यवतमाळ जिल्ह्यातील वणी येथून 14 लाख 80 हजार 500 रुपये किमंतीचा मुद्देमाल चोरी करून पसार झालेल्या एका आरोपीला शेंदुरजना घाट परिसरात अटक करण्यात अमरावती जिल्हा ग्रामिण पोलिसांना यश आहे. साहील उर्फ सायलु रामा घोडमारे (वय 26 वर्ष, रा. मिरची प्लॉट, वरूड ता. वरूड जि. अमरावती) असे आरोपीचे नाव आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील वणी पोलिस ठाण्याच्या हद्दीतून आरोपी साहिलने सोने, चांदी व नगदी असा एकुण 14 लाख 80 हजार 500 रूपयांचा मुददेमाल चोरून नेला होता. या घटनेच्या तक्रारीवरून वणी पोलिसांनी आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. सदर गुन्हयातील आरोपी साहील उर्फ सायलु रामा घोडमारे फरार झाला होता. 22 फेब्रुवारी रोजी तो शेंदुरजनाघाट हद्दीमध्ये फिरत असल्याची गोपनीय माहीती अमरावती ग्रामिण पोलिसांना मिळाली. या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेवुन पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी फरार आरोपीस ताब्यात घेण्याबाबत आदेशीत केले. त्यानुसार सहायक पोलिस निरीक्षक दिपक वि. महाडीक, पोलिस हवालदार उमेश बुटले, सागर लेव्हरकर यांनी फरार आरोपीचा कसोशीने शोध घेऊन, त्याला वरूड ते तिवसाघाट रोडवरील रडके पेट्रोलपंपाजवळ ताब्यात घेतले. त्याला वणी पोलिसांचया ताब्यात देण्यात आले.सदरची कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधीकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक दिपक महाडीक यांच्या पथकाने केली.



14 लाख 80 हजार 500 रूपयांचा मुद्देमाल चोरून झाला होता पसार

# रन फॉर लेप्रसी मॅरेथॉन स्पर्धा 25 फेब्रुवारी रोजी

महासागर प्रतिनिधी
अमरावती,( दि.23 )-कुष्ठरोग निवारण दिन म्हणून 30 जानेवारी हा दिवस देशभर साजरा करण्यात येतो. या पार्श्वभूमीवर 30 जानेवारी ते 13 फेब्रुवारी 2025 या कालावधीत स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान संपूर्ण जिल्ह्यात राबविण्यात आले. याअंतर्गत कुष्ठरोगाविषयी जनजागृती होण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन कुष्ठरोगाबाबत भिती व गैरसमज दूर करण्यासाठी जनजागृती करण्यात आली. या आजाराविषयी जनजागृती करण्यासाठी मंगळवार, दि. 25 फेब्रुवारी रोजी सकाळी 7 वाजता जिल्हा क्रीडा स्टेडिअम, मोर्शी रोड येथून 'रन फॉर लेप्रसी मॅरेथॉन'चे आयोजन करण्यात आले आहे.



स्पर्धेचे अंतर पुरुषांसाठी सुमारे 5 कि.मी. तर महिलांसाठी अंतर 3 कि.मी. राहील. पुरुषांसाठी स्पर्धेचा मार्ग जिल्हा क्रीडा स्टेडिअम, इर्विन चौक, आय.एम.ए. हॉल, गर्ल्स हायस्कुल चौक, बचत भवन, पंचवटी, गणेशदास राठी हायस्कुल समोरुन जिल्हा क्रीडा स्टेडिअम असे राहील तर महिलांसाठी स्पर्धेचा मार्ग जिल्हा क्रीडा स्टेडिअम, इर्विन चौक, आय.एम.ए. हॉल, गर्ल्स हायस्कुल चौक, डावीकडे वळून गणेशदास राठी हायस्कुल समोरुन जिल्हा क्रीडा स्टेडिअमकडे असे राहील.

रन फॉर लेप्रसी मॅरेथॉन स्पर्धा 10 वर्षांवरील व्यक्तींकरिता असून रजिस्ट्रेशन निःशुल्क आहे. ही स्पर्धा फक्त अमरावती जिल्ह्यासाठी आहे. स्पर्धेमध्ये रजिस्ट्रेशन करणाऱ्या पहिल्या 100 पुरुष व पहिल्या 50 महिला यानांच सहभागी होता येईल. प्रथम येणाऱ्यास प्राधान्य राहील. सोबत आधारकार्ड आणणे अनिवार्य आहे. स्पर्धकांना टी-शर्ट व स्पर्धेनंतर प्रमाणपत्र देण्यात येईल. स्पर्धेमध्ये प्रथम येणाऱ्यास 4 हजार रुपये, व्दितीय येणाऱ्यास 2 हजार 500 रुपये व तृतीय क्रमांक पटकावणाऱ्यांना 1 हजार 500 रुपये बक्षीस देण्यात येईल. स्पर्धेमध्ये परीक्षकांचा निर्णय अंतीम राहील.

स्पर्धकांना निरोगी असल्याचे हमीपत्र भरुन द्यावे लागेल. अधिक माहितीसाठी 9765438802 तसेच 9404201377 येथे संपर्क साधावा.

# पर्वताबाई घोरपडे यांचे निधन

हिवरखेड- येथील माजी ग्रामपंचायत सदस्य रतन शामराव घोरपडे यांच्या मातोश्री गं.भा. पर्वताबाई शामरावजी घोरपडे यांचे गुरुवार दिनांक 20 फेब्रुवारी 2025 ला वयाच्या 86 व्या वर्षी



वृध्दापकाळाने निधन झाले. त्याचे मागे एक मुलगा, एक सुन, पाच मुली, दोन जावई नातू व नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

# हिवरखेड येथे रक्तदान व आरोग्य शिबीर

## 51 रक्तदात्यांनी केले रक्तदान

## डीएमएक्स ग्रुप आशा ट्रस्टचे आयोजन

महासागर प्रतिनिधी
हिवरखेड,( दि.23 ) - डीएमएक्स ग्रुप आणि आशा चॅरिटेबल ट्रस्ट तथा श्री सद्गुरू गजानन महाराज ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने सोलर एक्सपर्ट प्रस्तुत स्व. प्रदीप बाबाराव गडेकर स्मृती प्रित्यर्थ शिवजयंतीच्या पावन पर्वावर रक्तदान व आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान शिबिरात 51 रक्तदात्यांनी रक्तदान केले.



तवेच यावेळी आशा चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने 200 रुग्णांची नेत्र तपासणी व 300 रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली. नेत्र शस्त्रक्रियेसाठी डॉ. पंजाबराव देशमुख हॉस्पिटल अमरावतीची टीम उपस्थित होती.

या कार्यक्रमाला खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार चंदू यावलकर, डॉ. वसुधा बोंडे, सरपंच सविता गोपाल मालपे, उपसरपंच सचिन तायवाडे, मनोहर आंडे, निलेश शिरभाते, बाबासाहेब धरमकर, धनंजय उमप, प्रवीण श्रीराव, इंगळे मॅडम, घाडेकर, सतीश धोटे, उपस्थित होते. राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली 365 दिवस निरंतर रक्तदान अभियाना अंतर्गत या रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. उन्हाळ्याच्या दिवसात रक्ताचा तुटवडा निर्माण होत असल्याने रुग्णांवरील उपचारात अडचणी येतात. ही गंभीर समस्या लक्षात घेऊन सामाजिक कार्यात नेहमीच मोलाचा वाटा उचलणारे डीएमएक्स ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष ऋतिक मालपे यांच्या नेतृत्वात हे रक्तदान शिबिर पार पडले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ऋषिकेश सावरकर, ऋतिक भोजने, ऋतिक गहूकर, रोहित उपासे, शुभम तडस, दर्शन पाचघरे, समीर दारोकर, रोहित पारधे, सारंग द्रव्येकर, कृणाल तडस, दीप देवघरे, प्रज्वल भोजने, वेदांत भेले यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन कल्पक जावरकर यांनी केले.

# राज्यपालांची वझ्झर अनाथ आश्रमास भेट





## अनाथ आश्रमाला दिल्या भेटवस्तू

महासागर प्रतिनिधी
परतवाडा,( दि.23 )- राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज वझ्झर येथील स्व. अंबादासपंत वैद्य मतिमंद मूकबधिर बेवारस बालगृहाला भेट दिली. यावेळी राज्यपाल यांनी अनाथ आश्रमाला भेटवस्तू दिल्या. तसेच बुरघाट येथील निवासी शाळेला भेट दिली.

वझ्झर बालगृहात राहून मोठ्या झालेल्या आणि आता लग्न झालेल्या मतिमंद, मूकबधिरांना राज्यपालांच्या हस्ते भेटवस्तू देण्यात आली. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री शंकरबाबा पापळकर, आमदार केवलराम काळे, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, अतिरिक्त आदिवासी आयुक्त रवींद्र ठाकरे, राजभवनचे नियंत्रक जितेंद्र वाघ, उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव, तहसीलदार संजय गरकल, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त राजेंद्र जाधवर, अनिल गडेकर आदी उपस्थित होते.

राज्यपाल राधाकृष्णन यांनी बालगृहातील मुलांची भेट घेवून विचारपूस केली. लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण केलेल्या माला पापळकर यांचा राज्यपालांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

पापळकर यांनी बेवारस मतिमंद मुलांच्या कायम पुनर्वसनाची मागणी केली. तसेच अनाथश्रमातील 12 मुलामुली शासकीय नोकरी करीत आहे. तसेच आश्रमात 123 विकलांग मुले आहेत. त्यांच्या वयाची 18 वर्षे पूर्ण झाल्यानंतर बालगृहात राहता येत नाही. तथापि, हा नियम या मुलांसाठी जाचक असल्याने त्यात सुधारणा आवश्यक असल्याचे सांगितले.

राज्यपाल राधाकृष्णन यांनी, प्रत्येक मागणीबाबत सकारात्मक मदत करण्यात येईल. बेवारस, मतिमंद व मुकबधिर मुलांचे प्रश्न जाणून घेवून पद्मश्री शंकरबाबा पापळकर यांनी पालकत्व स्वीकारले आहे. पापळकर यांच्या मागणी आणि मुलांचे प्रश्न सोडवण्यासाठी जातीने लक्ष दिले जाईल. बेवारस, मतिमंद मुलांच्या पुनर्वसनासाठी शंकरबाबा पापळकरांनी केलेले कार्य गौरवास्पद आहे. या क्षेत्रातील त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे. पद्मश्री पुरस्काराचा सन्मान हा सर्व मुलीमुलींचा आणि त्यांचा सांभाळ करणाऱ्यांचा असल्याचे सांगितले.

यावेळी पद्मावती व दिलीप ढगे, बेबी व बल्लम पापळकर, वैशाली आणि अनिल पापळकर, शोभा आणि अमित पापळकर, सुशीला आणि अशोक देशमुख, शैलजा आणि राजेंद्र फुले यांना भेटवस्तू आणि %गीता% ग्रंथ भेट देण्यात आला. तसेच सलमा आणि सईद खान यांना भेटवस्तू आणि %कुराण% ग्रंथ भेट देण्यात आला. आश्रमातील गांधारी हिने स्वागतगीत सादर केले. त्यानंतर राज्यपाल राधाकृष्णन यांनी या अनाथाश्रमातील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची निवासी शाळा, बुरडघाट येथे भेट दिली. यावेळी त्यांनी मुलींशी संवाद साधला.

# दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप व शिवजयंती समारंभ उत्साहात

महासागर प्रतिनिधी
वरुड,( दि.23 )-येथील जागृत नवयुवक शिक्षण संस्थेद्वारा संचालित लोणीच्या स्व. केशवराव क्षिरसागर जागृत विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ तसेच शिवजयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून प्रसिद्ध अभिनेते तथा दिग्दर्शक हरीश आजनकर उपस्थित होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून गुरुकुल कॉन्व्हेंटच्या संचालिका हिमानी आजनकर, कन्हैया कोचिंग क्लासेसचे संचालक व ग्रामपंचायत सदस्य चेतन खोडस्कर, ओम कॉम्प्युटरचे संचालक मंगेश आसरे, यशवंत स्पर्धा परीक्षा इन्स्टिट्यूटचे संचालक रुपेश नारिंगे, नितीन उघडे, किशोर राऊत, शाळेचे मुख्याध्यापक साहेबराव पेठे यांची उपस्थिती होती. नववीच्या विद्यार्थ्यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देताना आपले मनोगत व्यक्त केले. तर दहावीच्या विद्यार्थ्यांनी सुद्धा निरोपाला उत्तर देऊन शाळेशी निर्माण झालेल्या ऋणानुबंधाला उजाळा दिला. दहावीच्या वर्ग शिक्षिका वैशाली लाड यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. चेतन खोडस्कर, रुपेश नारिंगे, हिमानी आजनकर, साहेबराव पेठ यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. यावेळी मंगेश आसरे यांनी घेतलेल्या महाआयटी जीनियस परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व मेडल प्रदान करण्यात आले. दहावीच्या विद्यार्थ्यांनी शाळेला भेटवस्तू प्रदान केली. यावेळी जयंती निमित्त छत्रपती शिवाजी महाराजांना वंदन करण्यात आले. गुरुदेव सेवा मंडळाचे प्रचारक भूषण जवंजाळ यांच्यासह विद्यार्थ्यांची छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन चरित्रावर आधारित भाषणे झालीत. विद्यार्थ्यांनी नृत्य, पोवाडा व शिव गीते सादर केलीत. मुख्याध्यापक साहेबराव पेठ यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनातील अनेक महत्त्वपूर्ण प्रसंग यावेळी कथन केले.



केशवराव क्षीरसागर जागृत विद्यालयात आयोजन


# कार्यालय नगर परिषद चांदुर रेल्वे

**निविदा सुचना २०२५-२६ करीता**

चांदुर रेल्वे नगर परिषदेव्दारा व्दि लिफाफा पध्दतीने खालील नमूद कामाकरीता सिलबंद निवीदा मागविण्यात येत आहे. तरी इच्छुक निवीदा धारकाला कोरे निविदा फार्म दि. २४/०२/२०२५ ते ०४/०३/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत अनामत रक्कम जमा करुन रोखपाल यांचे कडुन प्राप्त करुन घेता येईल. निवीदा धारकांनी सिलबंद पाकीट १ मध्ये रजिस्टेशन, व इतर अनुषंगीक कागदपत्रे व पाकीट क्र.०२ मध्ये दर नमूद करून सादर करावे.

निवीदा दि. ०५/०३/२०२५ ला ५.०० वाजता शक्य झाल्यास उघडण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचा तपशिल | अनामत रक्कम | निविदा फार्म किंमत |
|---|---|---|---|
| १ | छपाई साहीत्याचा पुरवठा करणे. | २०००/- | २००/- |
| २ | स्टेशनरी साहित्याचा पुरवठा करणे. (यादी नुसार) | २०००/- | २००/- |
| ३ | झेरॉक्स कॉपीचा दर पुरवठा करणे. (A3,A4 किंवा LEGAL आकाराच्या) | २०००/- | २००/- |
| ४ | कार्यालया करीता टेबल, लोखंडी रॅक, फिरती लोखंडी खुर्ची, प्लास्टीक खूर्च्या, लोखंडी कपाट इत्यादी साहीत्य खरेदी करणे. | २०००/- | २००/- |

अटी व शर्ती कार्यालयात पहावयास मिळेल.

( डॉ. विकास खंडारे )
मुख्याधिकारी
नगर परिषद चांदूर रेल्वे

जा.क्र. १८७ / भंडार./वि./नपचारे/२०२५

# बियरचा वापर केल्याने केस होतात सिल्की शाईनं





**सुंदर** केस एखाद्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वात अधिक भार टाकतात. मग तो पुरुष असो की महिला. सर्वांनाच आपल्या केसांना शाइनी आणि सिल्की ठेवण्यासाठी वेग वेगळ्या प्रकारांच्या प्रॉडक्ट्सचा वापर करावा लागतो, पण या प्रॉडक्ट्समुळे केसांना नुकसान होण्याची भिती सदैव असते. म्हणून घरगुती कंडिशनरचं केसांसाठी उत्तम असतात. म्हणून जाणून घेऊ असे काही घरगुती कंडिशनर्सबद्दल ...

१. एक कप बियरला एखाद्या भांड्यात तोपर्यंत गरम करा जो पर्यंत त्याचे प्रमाण अर्धे राहत नाही. गरम केल्याने बियरमधील अल्कोहल वाफ बनून उडून जाते. आता याला गार होऊ द्या, नंतर यात आपल्या पसंतीचा शँपू मिसळून द्या, लक्षात ठेवण्यासारखे म्हणजे ज्या शँम्पूचा वापर करत असाल तो एकाच ब्रँडचा असायला पाहिजे. या घोळला एका बाटलीत भरून ठेवा. जेव्हा कधी केस धुवायचे असतील याने केस धुआ, यामुळे राठ केसांमध्ये देखील निखर येईल. केस चमकदार आणि सुंदर दिसतील.

२. केळी केसांसाठी फारच उत्तम मानण्यात आले आहे. केळींची पेस्ट तयार करून त्यात काही थेंब मधाचे टाकून ही पेस्ट ३० मिनिटापर्यंत केसांवर लावून ठेवावे. नंतर गार पाण्याने केस धुऊन टाकावे.

३. आपल्या केसांना शॅम्पूने धुतल्यानंतर बियरचे काही थेंब पाण्यात घालून त्या पाण्याने एकदा परत केस धुऊन टाकावे. नंतर स्वच्छ पाण्याचे धुवावे. बियरमुळे तुमच्या केसांमध्ये चमक येईल आणि ते प्राकृतिकरीत्या मजबूत होतील.

४. केसांना शाईनी बनवण्यासाठी दह्यात शॅम्पू घालून आधीपासून लावून ठेवावे. डोक्यात जर कोंडा असेल तर काही थेंब लिंबाच्या रस त्यात घालून केसांना लावावे. वर दिलेले हे उपाय केल्याने नक्कीच फायदा होईल.



# आर्टिफिशीअल ज्वेलरीची चलती

**अनेक** महिलांच्या दृष्टीने सोन्याचे दागिने वापरणे परवडणारे नसते. अशा महिलांकरिता आर्टिफिशीअल ज्वेलरी म्हणजे फॅशन ज्वेलरीचा पर्याय चांगला आहे. सोन्याचे भाव सध्या नियंत्रणात असले तरी ते भाव केव्हा वाढतील याची शाश्वती देता येत नाही. त्यामुळेच फॅशन ज्वेलरीचा पर्याय अनेकांच्या दृष्टीने अपरिहार्य ठरला आहे. असे दागिने सोन्याच्या तुलनेत अत्यंत स्वस्त असतात. यातील डिझाईन आणि रंग ग्राहकांच्या दृष्टीने आकर्षक असतात. हे दागिने, सोन्यांच्या दागिन्यां प्रमाणेच कलाकुसरीने तयार केलेले असतात. हे दागिने तुटले किंवा

खराब झाले अथवा हरवले तर त्याचे फारसे दु:ख वापरणाऱ्याला होत नाही. महिलांमध्ये अशा दागिन्यांची आवड वाढू लागली आहे.

### यामागची कारणे खालीलप्रमाणे सांगता येतील

हल्लीच्या काळातील महिलांची जीवनशैली आमूलाग्र बदलली आहे. नोकरदार महिलांना अनेक ठिकाणी कामानिमित्त जावे लागते.

अशा वेळी नोकरदार महिलांना आपले व्यक्तिमत्त्व प्रभावी दिसण्याकरिता असा दागिन्यांचा मोठा उपयोग होतो. अशा दागिन्यांची किंमत सोन्याच्या दागिन्यांच्या तुलनेत कमी असल्याने त्यांची मागणी अचानक वाढली आहे. मध्यम वर्गातील महिलाही खरेदी करू शकतात.

महिलांना कपडय़ांना अनुरूप असे दागिने घालण्याची इच्छा असते. सोन्या-चांदीच्या तसेच हिऱ्यांच्या दागिन्यांमध्ये फारसे वैविध्य नसते.

मात्र अशा शोभेच्या दागिन्यांमध्ये भरपूर व्हरायटी उपलब्ध आहे. त्यामुळे आपल्या वस्त्र प्रावरणांना मॅच होतील असे दागिने आपल्याला यातून निवडता येतात.

सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून विचार केला तर असे दागिने सर्वाधिक उपयुक्त आहेत. सोन्याचे दागिने पळवून नेण्याच्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे महिलांना असे महागडे दागिने घालण्याचा धोका पत्करण्याऐवजी स्वस्तातले दागिने परवडतात. सोन्या, हिऱ्यांच्या दागिन्यांमुळे अनेकदा महिलांच्या जीवाला धोका उत्पन्न होऊ शकतो, असेही दिसून आलेले आहे. या पार्श्वभूमीवर फॅशन ज्वेलरी वापरणे सर्वाधिक सुरक्षित ठरते.

फॅशन ज्वेलरीमध्ये एकाहून एक असे चांगले डिझाइन उपलब्ध असतात. अनेक डिझाइन असल्यामुळे निवड करण्यास वाव राहातो.

कौटुंबिक मालिकांमध्ये नायिका, सून, सासू यासारखी पात्रे ज्या पद्धतीचे दागदागिने वापरतात, तसे वापरण्याची फॅशन महिलांमध्ये रूढ झाली आहे. मालिकांमधील स्त्री पात्रे फॅशन ज्वेलरीचाच वापर करीत असल्याने त्यांचे अनुकरण करणाऱ्यांची संख्या वाढली आहे. म्हणूनच फॅशन ज्वेलरीच्या मागणीत वाढ झाल्याचे दिसते.

# सूर्यनमस्काराचे फायदे



**आजकाल** फिटनेसप्रति सजगता वाढतेय. बॉलीवूडच्या बलदंड नायक आणि सुकुमार नायिकांचा आदर्श समोर ठेवत बरेच जण व्यायामाकडे वळताहेत. शरीर फिट अँण्ड फाईन ठेवण्यासाठी वर्कआऊट, डाएटिंग आदींची जोरदार तयारी करतात. मात्र साध्या सूर्यनमस्कारातूनही शरीराला परिपूर्ण व्यायाम मिळण्याची तजवीज आहे.

नियमितपणे सूर्यनमस्कार घातल्यास फिटनेस राखणे सहज सुलभ होऊ शकते. या एका व्यायाम प्रकारात विभिन्न प्रकारच्या व्यायामांचे लाभ समाविष्ट आहेत. कुठल्याही वयाची व्यक्ती या व्यायाम प्रकाराने फिटनेस मिळवू शकते. यामध्ये बारा आसने आहेत. बारा आसने करताना बारा श्लोकांचे उच्चारण होते. योग्य प्रशिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली सूर्यनमस्कार घातल्यास अत्यंत कमी अवधीत चांगले परिणाम दिसून येतात. सुरुवातीला एका वेळी तीन नमस्कार घालून नंतर संख्या वाढवली जाते

# आपले मुले ही खातात का पोटॅटो चिप्स ?

**हल्ली** पॅक्ड आणि रेडीमेड फूड मुलांची पाहिली पसंत झाली असून व्यस्त असलेले पालक देखील मुलांनी भूक म्हटले की सोपेरित्या सगळीकडे उपलब्ध असणारे असे काही पदार्थ मुलांना घेऊन देतात. त्यातलाच एक पदार्थ आहे पोटॅटो चिप्स. पण आपल्या हे माहीत आहे का की हे चिप्स मुलांच्या आरोग्यासाठी किती धोकादायक आहे ?

हे चिप्स स्वादिष्ट असले तरी आरोग्यावर विपरित परिणाम टाकणारे असतात. हे फक्त पोटासाठीच नव्हे तर पूर्ण शरीरासाठी धोकादायक आहे. काही तज्ज्ञ याची तुलना अल्कोहल किंवा ड्रग्सशी करतात कारण एकाप्रकारे हे एक जीवघेणं व्यसन आहे. एकदा का याची सवय पडली की यापासून दूर राहणे कठिण जातं. यात असे काही पदार्थ समाविष्ट असतात ज्याने हे पुन्हा-पुन्हा खायची इच्छा होते. याचे जास्ती सेवन आपल्या परिवारासाठी धोकादायक आहे.

हे जंक फूड असल्यामुळे यातून कुठल्याही प्रकारचं पोषण मिळत नाही. उलट यात भरपूर हानिकारक कॅलरीज असतात. याची सवय पडल्याने अनेक प्रकाराचे शारीरिक विकार उत्पन्न होऊ शकतात. हे बनविण्यासाठी वापरण्यात येणारे सडके बटाटे, लो क्वालिटी तेल आणि अतिरिक्त प्रमाणात टाकण्यात येत असलेल्या मिठामुळे लठ्ठपणा, अन्न न रुचणे, पोटातील विकार, ब्लड प्रेशर, कोलेस्टरॉल, किडनी आणि हृद्यासंबंधी आजार देखील होण्याची शक्यता असते.

फक्त वरतून पडणारे मसाले आणि इतर फ्लेवर्समुळे आपल्याला याची लो क्वालिटी जाणवत नाही. जाहिरातींमध्ये ते लाख म्हणत असतील की हे खूप चांगल्या पदार्थांने निर्मित केलेले असतात पण याची किंमत पाहता आपण ही अंदाजा लाऊ शकता की त्यांना एवढ्यात चांगली क्वालिटी देणे परवडत असेल का ?

म्हणून लवकरात लवकर याची सवय दूर करून मुलांच्या आरोग्याची काळजी घेण्याची गरज आहे



# आरामदायक आणि आकर्षक परिधान



स्कर्टची अनेक रुपे आहेत. उदाहरणार्थ शॉटस्कर्ट , मिनी स्कर्ट , लॉंग्ग स्कर्ट युवतींना समोर ठेवून स्कर्ट तयार केले. जातात. फॅशन विश्वात होत असलेल्या नित्य नव्या प्रयोगांनी तर स्कर्टला ऐवढे लोकप्रिय केले आहे की प्रत्येक तरुणीला तो हवाहवासा वाटतो. १९२३ चे दशक महिलांसाठी फॅशनचा सुवर्ण काळ होता. याच दशकात फ्रेंच डिझायनर शॅनर कोको संपूर्ण जगात फॅशन स्त्रोत होऊन पुढे आले.



**काही** तरुणी आपल्या शरीराला ओझे वाटणार नाही असा पेहराव करतात. स्कर्टही असेच परिधान आहे. जे उन्हाळ्यात सुखावह वाटण्यासाठी वापरले जाते स्कर्टची लांबी आपल्या पायांच्या आकारावर अवलंबून असते. सडपातळ , सुडेल व गौरवर्णी पाय मिली स्कर्टमध्ये सुंदर तर दिसतातच शिवास ग्लॅमरस लुकही देताता . बऱ्याच तरुणी उन्हाळ्यात सलवासूट ऐवजी स्कर्टला प्राधान्य देतात. त्यामुळेच उन्हाळ्यात तो सर्वोत्तम परिधान मानला जातो.

स्कर्टची अनेक रुपे आहेत. उदाहरणार्थ शॉटस्कर्ट , मिनी स्कर्ट , लॉंग्ग स्कर्ट युवतींना समोर ठेवून स्कर्ट तयार केले. जातात. फॅशन विश्वात होत असलेल्या नित्य नव्या प्रयोगांनी तर स्कर्टला ऐवढे लोकप्रिय केले आहे की प्रत्येक तरुणीला तो हवाहवासा वाटतो. १९२३ चे दशक महिलांसाठी फॅशनचा सुवर्ण काळ होता. याच दशकात फ्रेंच डिझायनर शॅनर कोको संपूर्ण जगात फॅशन स्त्रोत होऊन पुढे आले. स्कर्टला टेलर शॉपमधून बुटीकपर्यत आणण्याचे श्रेय शॅनललाच जातो. गुडघ्यापर्यतचे स्कर्ट नेहमी वापरले जातात. स्कर्टची फक्त उंचीनुसार विभागणी होत असे नव्हे, ते डिझाइन व घेराच्या आधारावरही निरानिराळया रुपांमध्ये विभागले गेले आहेत. एकीकडे अम्ब्रेला टाइप स्कर्टची फॅशन आहे. तर दुसरीकडे टाइट स्कर्टची. रंग व केमिकल्सक्षच्या मदतीने स्कर्ट लोभस बनवला जातो. स्कर्ट विविध फॅब्रिकमध्ये खरेदी करू शकता.

# केसांनी कळतो स्वभाव

बऱ्याच तरूणी केसांना जिवापाड जपतात. कारण, लांबसडक, काळेभोर केस हा सौंदर्याचा आरसा असतो. त्यामुळे काहींना लांबसडक केस आवडतात तर काहींना वेगवेगळे हेअर कट करणं आवडतं. केसांची ठेवण पर्सनॅलिटीमध्ये कमालीचा फरक घडवून आणते. आजकाल ब्युटी पार्लर्स तेजीत असल्यामुळे केसांवर आपल्याला हवे तसे प्रयोग करता येतात. म्हणजेच व्यक्तिमत्त्वामध्ये केसांना किती महत्त्व प्राप्त झालं आहे हे लक्षात येईल. पण, हे केस बोलततातही बरं का? एका संशोधनानुसार केसांवरून त्या व्यक्तीचा स्वभाव ओळखता येतो हे स्पष्ट झालं आहे. एखाद्या व्यक्तीला कशा प्रकारची हेअरस्टाईल आवडते अथवा त्या व्यक्तीच्या केसांची ठेवण कशी आहे यावरून स्वभावाचा अंदाज बांधता येऊ शकतो.

केसांमध्ये वापरण्यात येणाऱ्या अँक्सेसरीजमधूनही स्वभावाची पारख करता येते. केसांमध्ये चित्रविचित्र, ठसठशीत हेअर अँक्सेसरीज घालणं आवडणाऱ्या तरूणी गर्दीपासून निराळ्या राहणाऱ्या किंवा फटकून वागणाऱ्या असतात. त्यांचे वागणे चारचौघींप्रमाणे नसते. अशा अँक्सेसरीज घालून रॅम्पवर अवतरणाऱ्या मॉडेल आपल्यातल्या वाटत नाहीत ते याचमुळे. कपाळाच्या वर फार चकमक नसणारा, साधासा, निटेड, पिंट्रेड हेअरबेल्ट वापरल्याने व्यक्तिमत्त्वाला कोझीनेस प्राप्त होतो. अशा प्रकारे केस बांधणाऱ्या मुली आतल्या गाठीच्या वाटत नाहीत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला एक प्रकारचा उबदारपणा प्राप्त होतो. काही जणींना केसांमधल्या एखाद्या बटेला लपेटण्याची हौस असते. अशांना थोडी हटके हुशारी असणारं आर्टिस्टिक समजलं जातं. शिवाय अशा मुली ट्रेण्डी असतात. आणखी एक बाब म्हणजे मलाईका किंवा शिल्पा शेट्टीसारखे तुमचेही केस लांब आणि वेव्ही असतील तर तुम्ही निश्चितच भाग्यवान आहात. अशा प्रकारचे केस मादक आणि फेमिनाईन समजले जातात. चारजणींमध्ये लक्ष वेधून घेणारा हा केशसंभार परफेक्ट समजला जातो. लांबसडक केस मोकळे सोडणं आवडणाऱ्या स्त्रिया मोकळ्या, फुलपाखरी वृत्ती असणाऱ्या समजल्या जातात. मध्यम लांबीच्या मोकळ्या केसातून तुमचं ईव्हन टेम्पर झळकतं, आत्मविश्वास दिसतो. अशा प्रकारचे केस असणाऱ्या स्पष्टवक्त्या असतात. मध्यम लांबीचे किंवा लांब, मोकळे, वाऱ्यावर उडणारे, थोडे अस्ताव्यस्त केस आय डोण्ट केअर वृत्ती दर्शवतात. अशा स्त्रिया बिनधास्त आणि जगाची पर्वा न करणाऱ्या असतात. बॉयकटपासून डायनाकटपर्यंत सगळे छोटय़ा कटचे प्रकार

व्यक्तिमत्त्वातली शिष्टपणाची बाजू समोर आणतात. त्यातून समोरच्याला हातभर दूर राहाण्याचा संकेत दिला जातो. भांग पाडून वेणी घालणं हा गर्लिश लूक आहे आणि तो क्यूट, इनोसंट समजला जातो.

# इंग्रजी म्हणजे ज्ञान नव्हे, केवळ एक भाषा

**महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचे प्रतिपादन**



■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २३ :

प्रत्येक भाषेचे एक वेगळे वैशिष्ट्य असते. आपल्या मातृभाषेचा अभिमान बाळगणे चुकीचे नाही. पण, त्यामुळे आपण इतर भाषांचा द्वेष करतो, असा गैरसमज निर्माण केला जातो. संस्कृत, पाली, इंग्रजी, हिंदी आणि देशातील इतर भाषांमधील साहित्याचा मातृभाषांमध्ये अनुवाद व्हायला हवा. कुठल्याही भाषेचा द्वेष करण्याची गरज नाही. इंग्रजी म्हणजे संपूर्ण ज्ञान नव्हे, तर ती केवळ एक भाषा आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी रविवारी येथे केले.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या ४१ व्या दीक्षांत समारंभात ते बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई, कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते आदी उपस्थित होते. राज्यपाल म्हणाले, माझ्या राज्यपालपदाच्या कार्यकाळात मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला, हा माझ्यासाठी सन्मानाचा आणि भाग्याचा क्षण आहे. तामिळला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, यासाठी बराच मोठा संघर्ष करावा लागला.

अखेर दिवंगत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या कार्यकाळात तमिळला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला, हा आमच्यासाठी सर्वोच्च आनंदाचा क्षण होता.

त्या तुलनेत मराठीला सहजरीत्या हा दर्जा मिळाला. राज्यपाल म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांनी अधिकृत कामासाठी मराठीचा वापर केला, ज्यामुळे तिला राजेशाही दर्जा मिळाला. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत जनाबाई, संत गाडगे बाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी मराठी भाषेत विपुल लेखन आणि उपदेश केले.

इतर भाषांसोबतच आपण मराठी या अभिजात भाषेच्या विविध बोलींचा अभ्यास आणि जतन केले पाहिजे. संस्कृत, पाली, इंग्रजी, हिंदी आणि भारतातील इतर अभिजात भाषांमध्ये साठवलेले ज्ञान मराठीत भाषांतरित केले पाहिजे, जेणेकरून सामान्य माणसाला त्याचा फायदा होईल.

राज्यपाल म्हणाले, विद्यापीठात पारंपारिक अभ्यासक्रमांसोबतच, आपण कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग, डेटा सायन्स, सायबर सुरक्षा आणि रोबोटिक्स यांसारख्या प्रगत क्षेत्रात शिक्षण देण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

अभ्यासक्रम अशा प्रकारे तयार केले पाहिजेत, जे उद्योगांच्या गरजा पूर्ण करतील. शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना केवळ रोजगारक्षम बनवता कामा नये, तर त्यांच्यात कामाप्रती आणि जीवनाप्रती योग्य दृष्टिकोनही आणला पाहिजे. तरच वाढलेल्या सामाजिक आनंदाने राष्ट्राचा विकास साधता येईल. आपण परदेशी विद्यापीठांशी भागीदारी करून विद्यार्थ्यांसाठी बाजारपेठेच्या मागण्या पूर्ण करणारे नाविन्यपूर्ण कार्यक्रम देण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

# नागपुरात स्टंटबाजी करणाऱ्या पाच कारधारकांवर कारवाई
# प्रत्येकी २३ हजारांचे चालान



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

नागपूर पोलिसांनी अमरावती रोडवर स्टंटबाजी करणाऱ्या युवकांवर कडक कारवाई केली आहे. रविवारी रात्री दहा ते बारा युवक पाच कारमधून फिरत असताना त्यांनी केलेली स्टंटबाजी त्यांनाच महागात पडली. या युवकांनी कारच्या छतावर चढून आणि खिडकीतून बाहेर निघून धोकादायक स्टंट केले. त्यांनी या स्टंटबाजीचे व्हिडिओ काढून ते इन्स्टाग्रामवर अपलोड केले. हे व्हिडिओ काही तासांतच शहरातील अनेक व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये व्हायरल झाले. वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अर्चित चांडक यांच्या निदर्शनास हा प्रकार आला. त्यांनी तात्काळ कारवाईचे आदेश दिले. पोलिसांनी व्हिडिओमधील कार नंबरवरून मालकांचा शोध घेतला. सर्व पाच कार ताब्यात घेण्यात आल्या.

प्रत्येक कारवर २३ हजार रुपयांचे चालान ठोठावण्यात आले. स्टंटबाज युवक आणि त्यांच्या पालकांना वाहतूक उपायुक्त कार्यालयात बोलावण्यात आले. युवकांना पालकांसमोर लेखी माफी मागावी लागली. त्यांच्याकडून भविष्यात असे कृत्य न करण्याचे हमीपत्र घेण्यात आले.

पोलिसांनी या युवकांचा दोन तास वाहतूक नियमांचा वर्ग घेतला. पालकांनाही त्यांच्या मुलांच्या स्टंटबाजीचे व्हिडिओ दाखवून सूचना देण्यात आल्या. नागपूर पोलिसांनी या युवकांचा माफी मागतानाचा व्हिडिओ आपल्या इंस्टाग्राम अकाउंटवर पोस्ट केला आहे. या कारवाईमुळे शहरातील स्टंटबाज युवकांमध्ये खळबळ उडाली आहे.

# वाळु तस्करांची यादी तयार करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करा : बावनकुळे



■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. २३ :

जिल्ह्यात सर्वत्र वाळू माफियांचा हैदोस सुरू आहे. मात्र प्रशासनाकडे वाळू माफियांचा यादी नसल्याने महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल प्रशासनास चांगलेच धारेवर धरले. वाळू तस्करांची यादी ताबडतोब तयार करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करत हद्दपारीची कारवाई करण्यात यावी, असे निर्देश मंत्री बावनकुळे यांनी दिले. उमरखेड येथे नगरपरिषदेच्या सभागृहात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक घेतली.

यावेळी त्यांनी उमरखेड विभागातील महसूलच्या विविध बाबींचा आढावा घेतला. यावेळी उमरखेडसह जिल्ह्यात वाळू माफिया शिरजोर होत असून सामान्य नागरिकांना रेतीसाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षाची माहिती काही पदाधिकाऱ्यांनी महसूल मंत्र्यांना दिली. त्यावेळी बावनकुळे यांनी वाळू माफियांचा यादी कुठे आहे, अशी विचारणा केली.

वाळू चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणावर घडत असल्याचे दिसत असताना यादी नसल्याने कारवाई कोणावर करायची, असा प्रश्न उपस्थित करत वाळू माफियांची यादी तयार करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याचे निर्देश त्यांनी दिले. सोबतच पोलीस विभागाच्या मदतीने वाळू माफियांवर हद्दपारीची कारवाई करण्यात यावी, अशी सक्त ताकीद दिली. माध्यमांमध्ये महसूल विभागाच्या विरोधात येणाऱ्या बातम्यांकडेही त्यांनी लक्ष वेधले. महसूल विभागाच्या विरोधात येणाऱ्या बातम्यांचे खंडन संबंधित अधिकाऱ्याने करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

महसूल विभागाच्या वतीने सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी अनेक फ्लॅगशिप योजना राबविण्यात येत आहे. या योजनांची उत्तम अंमलबजावणी करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी केल्या. महसूल विभागाच्या योजना, उपक्रमांचा लाभ गावकऱ्यांना त्यांच्या गावात एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी गावनिहाय महसूली शिबिरे घेण्यात यावी. या ठिकाणी जास्तीत जास्त नागरिकांना विविध सेवांचा लाभ उपलब्ध करून देण्यात यावा.

# हँडल लॉक असलेल्या दुचाकींचीही चोरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

दुचाकी हँडल-लॉक करुन पार्किंगमध्ये ठेवली की वाहनमालक बिनधास्तपणे आपले काम करायला निघून जातात. मात्र, हँडल-लॉक असलेली दुचाकीसुद्धा अगदी सहजरित्या चोरी करणाऱ्या टोळ्या उपराजधानीत सक्रिय झाल्य आहेत. एका टोळीने अवघ्या सात महिन्यांत शहरातून एक नव्हे, दोन नव्हे तर तब्बल ६२ दुचाकी चोरल्या.

आरोपी चोरीची वाहने भंडारा जिल्ह्यातील तुमसर येथे आणून विक्री करायचे. टोळीचे येथूनच रॅकेट चालत होते. गुन्हे शाखेच्या पोलिसांनी टोळीतील पाच सदस्यांना मुसक्या आवळत ६२ दुचाकींसह एकूण २० लाख ४५ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. आकाश किशोर खोब्रागडे (२५), आकाश संपतलाल परतेकी (२७), मयंक उर्फ क्रिश विनोद बारीक (१९), दीपक द्वारकाप्रसाद बिजांडे (२४) त्याचा भाऊ विजय उर्फ गोलू द्वारकाप्रसाद बिजांडे (३४) अशी आरोपींची नावे असून ते सर्व तुमसर येथील रहिवासी आहेत.

यशोधरानगर पोलीस ठाणे हद्दीतील भीलगाव, ग्राम पंचायत गेट समोरून तसेच ऑटोमोटीव्ह मेट्रो स्थानकाच्या पार्किंगमधून दोन दुचाकी चोरी गेल्या होत्या. तपासात गुन्हे शाखेच्या युनिट क्रमांक पाचच्या पथकाने जवळपास २०० ठिकाणी लावलेले सीसीटीव्ही तपासले. गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीवरून सीसीटीव्हीत दिसणारा आरोपी आकाश खोब्रागडे याला महाराजबाग परिसरातून ताब्यात घेतले. सखोल विचारपूस केल्यानंतर त्याने टोळीतील आकाश परतेकी आणि मयंक बारीक यांच्यासोबत मिळून शहरातून अनेक वाहन चोरी करून तुमसर येथील दीपक बिजांडे आणि विजय बिजांडे या दोन भावांकडे विक्रीसाठी दिल्याचे सांगितले. तुमसर गाठत पोलिसांनी आकाश, मयंक, दीपक तसेच विजय याला ताब्यात घेतले. पोलिसांना येथे अनेक चोरीच्या दुचाकी सापडल्या. काही वाहनांची आरोपींनी विक्री केली होती. ही विक्रीची वाहने देखील पोलिसांनी जप्त जप्त केली. आरोपींनी एकूण ६२ वाहने चोरल्या असून यातील ३८ चोरीचे गुन्हे पोलिसांनी उघडकीस आणले. आरोपी वाहन चोरीसाठी मास्टर की वापरायचे. आरोपी आकाश खोब्रागडे याच्याकडे मास्टर की सापडली. आरोपी गर्दीत ठेवलेले वाहनावर लक्ष्य करायचे. वाहन मालकावर नजर ठेवून वाहन चोरून तुमसरला पाठवायचे. येथे आरोपी दीपक आणि विजय हे वाहनांचे क्रमांक तसेच इंजीन व चेचीसमध्ये बदल करून लोकांना विक्री करीत होते.

# नागपुरात पूल खचला; गुन्हा दाखल
# एनएचएआयला नोटीस

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या खात्याने बांधलेला पूर्व नागपुरातील उड्डाणपूल उद्घाटनाच्या दुसऱ्याच दिवशी खचून एका युवकाच्या कारचे नुकसान झाले. या प्रकरणी वाठोडा पोलिसांनी कारमालकाच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तसेच या पुलाची बांधकाम करण्याची जबाबदारी असलेल्या एनएचएआय अधिकाऱ्यांना नोटीस दिली आहे.

कार मालक विशेष श्रीवास्तव हे शुक्रवारी कार घेऊन पारडी पुलाखालून जात होते. यादरम्यान पारडी उड्डाणपुलाचा प्लास्टरचा एक तुकडा श्रीवास्तव यांच्या कारवर पडला. यामध्ये कारचे जवळपास एक ते दीड लाख रुपयांचे नुकसान झाले. त्यामुळे विशेष श्रीवास्तव यांनी कारचे नुकसान भरपाई मिळवण्यासाठी वाठोडा पोलीस ठाण्यात लेखी तक्रार केली. याप्रकरणी वाठोडा पोलिसांनी लेखी तक्रारीवरून घटनेस जबाबदार संबंधित व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तसेच एनएचएआय च्या अधिकाऱ्यांना नोटीस बजावून संबंधित जबाबदार व्यक्ती बाबत विचारणा केली आहे. गुन्हा दाखल होताच एकच खळबळ उडाली असून आता पोलीस कारमालक विशेष श्रीवास्तव यांच्या लेखी तक्रारीवरून दाखल गुन्ह्याचा तपास करत आहेत.

# तिजोरीतील पैसे संपत आल्याने लाडक्या बहिणींना निकष : रामदास आठवले



■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २३ :

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना महायुतीसाठी विधानसभा निवडणुकीत गेमचेंजर ठरली. आता लाडकी बहीण योजना लाभार्थ्यांची संख्या कमी केली जात आहे. या योजनेसाठी कडक निकष लागू केले जात असून पात्र लाभार्थी महिलांची शासनाकडून पडताळणी होत आहे. यावरून रिपाइंचे अध्यक्ष रामदास आठवले यांनी महायुतील सरकारला घरचा आहेर दिला आहे. राज्य सरकारने लाडकी बहीण योजनेला सुरुवात केली त्यावेळी सरकारच्या तिजोरी मध्ये निधी होता. मात्र, आता तिजोरीतील पैसे संपत चालले आहेत. त्यामुळे या योजनेच्या लाभार्थ्यांना निकष लावण्यात येत असल्याचे रामदास आठवले म्हणाले.

गेल्या काही दिवसांपासून लाडकी बहीण योजनेला वेगवेगळे निकष लावण्यात येत आहेत.

तर अनेक महिलांनी स्वेच्छेने पैसे परत करण्याचा निर्णय घेतला आहे. आतापर्यंत पाच लाख लाभार्थी महिलांची संख्या कमी झाली आहे. त्यामुळे रामदास आठवले यांनी एक प्रकारे आपल्या वक्तव्यातून सरकारला घरचा आहेर दिला.

## आई-मुलीचे अश्लील व्हिडिओ व्हायरल करणारा आरोपी फरार

**नागपूर :** नागपुरातील जरीपटका परिसरात एका धक्कादायक प्रकरणाचा पदार्फाश झाला आहे. एका ४२ वर्षीय चालकाने महिलेसह तिच्या २० वर्षीय मुलीचे लैंगिक शोषण करून त्यांचे अश्लील व्हिडिओ इन्स्टाग्रामवर व्हायरल केले आहेत.

पीडित महिला दोन मुलींची आई असून जरीपटक्यात कुटुंबासह राहते. तिचा पती दारूच्या नशेत राहत असल्याने आणि बाहेरगावी काम करत असल्याने, महिलेची चालकाशी जवळीक वाढली. दहा वर्षांपूर्वी त्यांची ओळख झाली आणि दोघेही एकमेकांच्या प्रेमात पडले. आरोपीने महिलेसोबत शारीरिक संबंध प्रस्थापित केले आणि त्याचे अश्लील व्हिडिओ काढले. त्यानंतर त्याने महिलेच्या मोठ्या मुलीलाही लक्ष्य केले. आईचे अश्लील व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देऊन त्याने मुलीचेही लैंगिक शोषण केले. आरोपीने मुलीला महागडी भेटवस्तू देऊन आणि तिच्या आईसोबतचे व्हिडिओ दाखवून ब्लॅकमेल केले. हा प्रकार त्यावेळी उघडकीस आला जेव्हा आरोपीने दोघींचेही व्हिडिओ इन्स्टाग्रामवर व्हायरल केले. मायलेकींनी जरीपटका पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# कचऱ्याच्या ढिगाऱ्यात १५ पोती गोमांस

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २३ :

आशीर्वाद नगरातील कचरा डम्पिंग यार्डमध्ये १५ पोती गोमांस आढळल्याने खळबळ उडाली. माहिती मिळताच बजरंग दलाचे कार्यकर्ता घटनास्थळी पोहोचले. पोलिसांकडे कठोर कारवाईची मागणी केली. आरोपीला तत्काळ अटक करण्याची मागणी घेऊन कार्यकर्त्यांनी ठाण्याला घेरावही घातला. यामुळे काही वेळासाठी परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी या प्रकरणी एका व्यक्तीला ताब्यात घेतले आहे.

शनिवारी सकाळी एक युवक बेसा पॉवर हाऊसकडून आशीर्वादनगरकडे जात होता. त्याला रस्त्यावर गायीचे शिंग पडलेले दिसले. त्याने वाहन थांबवून आसपास बघितले असता कचऱ्यात आणखी शिंग दिसले. त्याने बजरंग दलाला याची माहिती दिली.

अमोल ठाकरे, कमल हरयानी आणि राहुल नारनवरेसह मोठ्या संख्येत बजरंगी घटनास्थळी पोहोचले आणि पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी महानगर पालिकेच्या सफाई कामगारांना घटनास्थळी बोलावले. कचरा हटवल्यावर १५ पोत्यांमध्ये मांस, आतड्या, गायीचे शिंग आणि दोन अर्भकही मिळाले. हे दृष्य पाहून बजरंगींचा पारा चढला आणि त्यांनी गो हत्या करणाऱ्याला तत्काळ अटक करण्याची मागणी केली. मात्र पोलिसांकडे कोणतीही माहिती नसल्याने ते हतबल होते.

यामुळे रोष वाढत गेला आणि मांस घेऊनच बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी ठाण्याला घेराव घातला. मास गोवंशाचेच असल्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी मांसाचे नमुने घेतले आणि अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदविला. मात्र बजरंगींनी आरोपीला अटक करण्याची मागणी लावून धरली होती. दरम्यान बेसा पॉवर हाऊसमागे कत्तलखाना असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी तेथून एका व्यक्तीला चौकशीसाठी ताब्यात घेतले.

## पीओपी मूर्ती कारागीरांची आता न्यायालयात जाण्याची तयारी
# पीओपी मूर्तींना पूर्णतः बंदी



■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २३ :

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) मूर्तींवर २०२० मध्ये बंदी घातली होती. मात्र विविध कारणांमुळे या निर्णयाची अंमलबजावणी लांबणीवर पडली. मात्र उच्च न्यायालयाने फटकारल्यानंतर यंदाच्या माघी गणेशोत्सवापासून १०० टक्के पीओपीबंदीचा निर्णय लागू करण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला होता. माघी गणेश जयंती उत्सवात पीओपी गणेश मूर्तींची कुठेही विक्री होऊ देऊ नका. ती झाली असल्यास त्या गणेशमूर्तींचे विसर्जन करू देऊ नका, असे आदेश उच्च न्यायालयाने ३० जानेवारी रोजी राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ (एमपीसीबी), राज्य सरकार आणि मुंबई महापालिकेसह अन्य महापालिकांना दिले होते. भाद्रपदातील गणेशोत्सवातही या निर्णयाची अंमलबजावणी केली जाणार आहे. त्याकरीता पालिका प्रशासनाने आतापासून नियोजन सुरू केले आहे.

गणेशोत्सवाला अद्याप सहा सात महिन्यांचा कालावधी असला तरी यंदाचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक असावा याकरीता पालिकेने आतापासूनच नियोजन सुरू केले आहे. केवळ पर्यावरणपूरक मूर्ती तयार करणाऱ्या मूर्तीकारांनाच यंदा मंडपासाठी परवानगी दिली जाणार आहे. तसेच मूर्तीकारांना यंदाही विनामूल्य शाडूची माती दिली जाणार आहे. उत्सवादरम्यान मुर्तीचे आगमन, विसर्जन सुकर होईल.

एवढ्या उंचीची मूर्ती घडवण्यात यावी अशी सूचक अट या परवानगीसाठी घालण्यात आली.

उच्च न्यायालयाच्या व पालिकेच्या निर्णयामुळे गणेशोत्सव मंडळेही संभ्रमात आहेत. मात्र यात सर्वात पहिला फटका पीओपीच्या मूर्ती तयार करणाऱ्या कारागिरांना बसणार आहे. पीओपीबंदीच्या निर्णयाविरोधात आपली बाजू मांडण्यासाठी मूतीर्कारांनी पुन्हा एकदा न्यायालयात धाव घेण्याचे ठरवले आहे.

पीओपी हे घातक नसून दैनंदिन जीवनात सर्वत्र त्याचा वापर होतो. प्लास्टर ऑफ पॅरिस लावलेल्या भिंतीच्या घरात आपण चोवीस तास राहतो. पीओपी मूर्तींवर बंदी घालण्यापेक्षा विसर्जनासाठी वेगळे पर्याय आणावे असे मत मूर्तिकार अनिल बाईंग यांनी व्यक्त केले आहे.


# महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी सोनालिकाचा चीता ट्रॅक्टर लाँच



भारतातील क्रमांक एकचा ट्रॅक्टर निर्यात ब्रँड असलेल्या सोनालिका ट्रॅक्टर ने 'चीता' श्रेणीतील ट्रॅक्टर सादर केले आहेत. यांचे डिझाईन नवीन लूकसह असून त्यामध्ये शक्ती, शैली आणि प्रगत तंत्रज्ञानाचा परिपूर्ण मिलाफ आहे.

'चित्त्यासारखी चपळाई आणि वेगा'ची हमी देणाऱ्या या नवीनतम हेवी-ड्युटी ट्रॅक्टर मॉडेल्समध्ये सोनालिका चीता डीआय ३२, सोनालिका चीता डीआय ३० ४डब्ल्यूडी आणि सोनालिका चीता एमएम १८ ट्रॅक्टर यांचा समावेश आहे. शेतीतील विशेष गरज असलेल्या शेतकऱ्यांच्या गरजा ते पूर्ण करतात.

या नवीन उत्पादनाद्वारे फळबागा, ऊस, डाळिंब, द्राक्षे आणि सुपारीची शेती करणाऱ्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा खर्च कमी करतानाच त्यांची कार्यक्षमता व कामगिरी सुधारण्याचे उद्दिष्ट सोनालिकाने बाळगले आहे. नवीन सोनालिका चीता मालिका शेतीच्या विविध गरजांसाठी शक्तिशाली ट्रॅक्टर पुरवते आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना त्यांची कामे अधिक सहजतेने आणि आरामात करण्यास सक्षम करते.

हेवी-ड्यूटी सोनालिका चीता डीआय ३२ मध्ये ३-सिलेंडरचे २,७८० सीसी इंजिन असून ते १३० एनएम टॉर्क देते. त्याची इंधन कार्यक्षमता या वर्गातील ट्रॅक्टरमध्ये सर्वोत्तम आहे, त्यामुळे आंतर-शेती आणि बागांसाठी ते आदर्श ठरते. याने रोटाव्हेटर, कल्टिव्हेटर आणि आरएमबी प्लो सारखी उपकरणे देखील सहजतेने वापरली जाऊ शकतात.सोनालिका चीता एमएम १८ हासुद्धा या नवीन मालिकेत उपलब्ध आहे. यामध्ये सिंगल -सिलेंडर ८६३.५ सीसी इंजिन असून ते ४७ एनएम टॉर्क देते. ■ ■ ■

लोकार्थ

# निष्ठावंत चाहत्यांना बक्षीस देण्यासाठी क्रिकेट आयकॉनसह 'धोनी' ॲप लाँच



क्रिकेट दिग्गज महेंद्रसिंग धोनीने अधिकृतपणे 'धोनी' हे त्याचे नवीन लॉयल्टी फॅन ॲप लाँच केले, जे समर्पित चाहत्यांना त्याच्या आयुष्यात एक अनोखी विंडो देते. जगातील आघाडीच्या रिवॉर्ड्स इकोसिस्टमपैकी एकाच्या प्रवेशाद्वारे त्यांच्या निष्ठेसाठी बक्षीस मिळण्याव्यतिरिक्त, चाहत्यांना त्यांच्या आदर्श जगाचे अंतर्गत दृश्य देखील मिळेल.

एनिग्मॅटिक स्माईलद्वारे क्रॉस-रिवॉर्ड प्रोग्राम आयडेंटिफायर असलेल्या Single.id च्या सहकार्याने विकसित केलेले, 'धोनी' ॲप वापरकर्त्यांना सिंगल आयडीच्या वाढत्या रिटेल नेटवर्कच्या व्यापक फायद्यांमध्ये प्रवेश मिळेल. यामध्ये भारतातील भागीदार ब्रँड्सवरील खरेदीवर रिवॉर्ड्स तसेच या ब्रँड्सकडून रिवॉर्ड पॉइंट्स, कॅश-बॅक आणि गिफ्ट कार्ड रिडीम करण्याची क्षमता समाविष्ट आहे. हे ॲप चाहत्यांना त्यांच्या क्रिकेट आदर्शाच्या जवळ जाण्याची एक अतुलनीय संधी देखील देते. नोंदणीकृत वापरकर्ते धोनीच्या आयुष्यातील कधीही न पाहिलेले व्हिडिओ, वैयक्तिक अंतर्दृष्टी आणि पडद्यामागील क्षणांचा विशेष प्रवेश घेऊ शकतात.

धोनी ॲप तुमच्या दैनंदिन खर्चातून तुम्हाला अधिक मूल्य देण्यासाठी डिझाइन केले आहे. तुम्ही सिंगल.आयडी तंत्रज्ञानाचा वापर करून प्रवास आणि पर्यटन, किरकोळ विक्रीपासून फॅशन आणि एफ अँड बी आउटलेट्सपर्यंतच्या श्रेणींमध्ये रिवॉर्ड्स रिडीम करू शकता. धोनी ॲप अधिक रिवॉर्ड्स, अधिक बचत आणि अधिक फायद्यांबद्दल आहे. ■ ■ ■

# मुंबईत जागतिक वस्त्रोद्योग तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी प्रदर्शन



इंडियन इंटरनॅशनल टेक्सटाइल मशिनरी एक्झिबिशन्स सोसायटी (इंडिया कळटए सोसायटी) ने गोरेगाव (पूर्व), मुंबई येथील बॉम्बे एक्झिबिशन सेंटर येथे एका भव्य उद्घाटन समारंभाने ग्लोबल टेक्सटाइल टेक्नॉलॉजी अँड इंजिनिअरिंग शो अधिकृतपणे सुरू केला. २१ ते २३ फेब्रुवारी हा तीन दिवसांचा कार्यक्रम भारतातील वस्त्रोद्योगासाठी एक मैलाचा दगड होता जो पारंपारिक दिवे लावण्याने सुरू झाला आणि तांत्रिक प्रगतीचे प्रदर्शन करत होता.

नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. कैलाश शिंदे आणि भारत सरकारच्या वस्त्रोद्योग आयुक्त श्रीमती रूप राशी महापात्रा यासारख्या प्रमुख व्यक्तींच्या उपस्थितीने GTTES २०२५ ला शोभा मिळाली. महापात्रासह मुंबईतील दक्षिण आफ्रिकेचे कॉन्सुल जनरल गिर्डोन लाबाने, बेलारूस प्रजासत्ताकाचे कॉन्सुल जनरल महामहिम अलेक्झांड्रे मात्सुको, बेलारूस प्रजासत्ताकाच्या कॉन्सुल जनरलचे कॉन्स्टँटिन पिचुक, बुर्किनाच्या राष्ट्रपतींचे सल्लागार आणि भारतातील माजी राजदूत इद्रिस रौको, नवी दिल्लीतील बोत्सवाना उच्चायुक्तालय, बुरुंडी दूतावास, म्यानमार प्रजासत्ताकाचे कॉन्सुलेट जनरल आणि तुर्की प्रजासत्ताकाचे कॉन्सुलेट जनरल उपस्थित होते.

केतन संघवी म्हणाले, "GTTES तंत्रज्ञानाच्या नवोपक्रम आणि तंत्रज्ञानाच्या देवाणघेवाणीचे केंद्र बनण्याची आपली वचनबद्धता कायम ठेवत आहे, 39 देशांना एकत्र आणत आहे आणि 210 प्रदर्शकांचा समावेश आहे, नेटवर्किंग शिक्षण आणि सहकार्यासाठी एक अतुलनीय व्यासपीठ तयार करत आहे. हे व्यवसाय आणि सहकार्यासाठी एक व्यासपीठ आहे, भारतातील औद्योगिक उत्पादनात कापड उद्योगाचा वाटा 13 टक्के, GDP मध्ये 2.3 टक्के आणि परकीय चलन प्रवाहात 12 टक्के आहे.

GTTES 2025 कापड यंत्रसामग्री उत्पादकांसाठी व्यवसाय आणि व्यापार वाढवण्यासाठी समर्पित आहे. हे विशेष व्यासपीठ सहभागींना केवळ भारतातीलच नव्हे तर जगभरातील एजंट आणि डीलर्सशी संवाद साधण्याची परवानगी देते, ज्यामुळे अमूल्य कनेक्शन आणि भागीदारी सुलभ होते. ■ ■

संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre@rediffmail.com